शुक्रवार, ५ जानेवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १४२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 5 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-142 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05

# मस्तवाल मंत्र्यांचा माज जनताच उतरवेल

## अतुल लोंढे : अब्दुल सत्तारांवर मुख्यमंत्री कारवाई करण्याची हिंमत दाखवतील का?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : पणन, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री अब्दुल सत्तार यांचा आणखी एक मस्तवालपणा महाराष्ट्राच्या जनतेला पहायला मिळाला. वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या गौतमी पाटीलच्या कार्यक्रमात काही तरुणांनी हुल्लडबाजी केली, त्यांना आवरण्यासाठी या मंत्री महाशयांनी पोलिसांना थेट लाठीचार्ज करण्याचेच आदेश दिले. धक्कादायक म्हणजे या लोकांना कुत्र्यासारखे मारा, त्यांचे कंबरडे मोडा, एक हजार पोलिसांचा बंदोबस्त असून ५० हजार लोकांना मारायला काय हरकत आहे? असे सत्तार म्हणतात. हा अब्दुल सत्तार मंत्री आहे की गुंड? मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या मुजोर सत्तारवर कारवाई करण्याची हिम्मत दाखवतील काय? असा संतप्त सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी विचारला आहे.**



मंत्री अब्दुल सत्तार व शिंदे सरकारचा समाचार घेत अतुल लोंढे पुढे म्हणाले की, भाजपाप्रणित शिंदे सरकार आल्यापासून सत्ताधारी मंत्री, आमदार, खासदार यांचा मस्तवालपणा वाढला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा पणन, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री अब्दुल सत्तारांनी सिल्लोड या ठिकाणी गौतमी पाटीलचा कार्यक्रम ठेवला होता. या कार्यक्रमात काही तरुणांनी हुल्लडबाजी केली. आपण आयोजित केलेल्या कार्यक्रमात गोंधळ होत आहे हे पाहून मंत्री महाशय संतापले व थेट लाठीहल्ला करण्याचा आदेश दिला व पोलिसांनीही लाठीहल्ला केला. महाराष्ट्राचे पोलीस मंत्र्याच्या वाढदिवसाच्या बंदोबस्तासाठी आहेत का? अब्दुल सत्तारांची भाषा पाहता ते मंत्रीपदावर राहण्याच्या लायकीचे नाहीत पण अशा मुजोर मंत्र्यांवर कारवाई करण्याचे धाडस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्यात नाही. मंत्री अब्दुल सत्तार हे वादग्रस्त आहेत, टीईटी घोटाळ्यात त्यांचे नाव आले होते, ३७ एकर गायरान जमीन घोटाळा, कृषी मंत्री असताना बोगस धाडी टाकून वसुली करण्यात सत्तारांच्या पीएचे नाव समोर आले होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याबाबतही सत्तार यांनी गलिच्छ भाषा वापरली होती. अब्दुल सत्तार हे नेहमीच त्यांची सत्तेची मस्ती दाखवून देतात पण आता अशा मुजोर, मस्तवाल सत्तारांना घरी बसवून जनताच त्यांची सत्तेची मस्ती उतरवेल, असे अतुल लोंढे म्हणाले.



# पोटासाठी मुलीची तारेवरची कसरत

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन गवळी**

**बाजार सावंगी :** देशभरात 3 जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. तर याच दिवशी दुसरीकडे सावित्रीबाई फुले यांची लेक पोटासाठी कसरत करताना दिसली. सावित्रीबाई फुले देशातील पहिल्या महिला शिक्षिका. त्यांनी महिला आणि मुलींना प्रेरणा दिली. महिला सशक्तीकरणाकरिता त्यांनी संपूर्ण जीवन समर्पित केले. त्यामुळेच त्यांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले म्हणतात. मुली समाजात कुठल्याच बाबतीत मागे राहू नये, विशेष करून शिक्षणाच्या बाबतीत मागे राहू नये यासाठी त्यांनी कष्ट उपसले. आज एकीकडे सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात येत होती आणि याच दिवशी दुसरीकडे याच सावित्रीबाई फुले यांची लेक सावित्री आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी शिक्षण सोडून कसरत करत होती. शिक्षण घेण्याच्या वयात, हातात वही, पुस्तके, पेन असण्याऐवजी त्या बालिकेच्या हातात कसरतीची काठी होती. पोटाची खळगी भरण्यासाठी उंच बांधलेल्या दोरीवर चालत, हातात काठी घेऊन दोरीवर कधी एका पायावर चालत, आपली कला, कौशल्य लोकांना दाखवत त्यांच्याकडून मिळणाऱ्या पैशांत आपली पोटाची खळगी भरण्यासाठी धडपडत होती. राजकीय नेते, काही सामाजिक संस्था सतत स्वतःची पाठ थोपटून घेत असतात की आम्ही सामाजिक कार्य करतो, महिला सक्षमीकरणासाठी आमचे प्रयत्न असतात. मग आजही अशा अनेक परिवारातल्या, अनेक मुली आहेत ज्यांना शिक्षणाची आवड आहे, शिकण्याची इच्छा आहे मात्र परिस्थितीमुळे त्यांचा नविलाज आहे. त्यांच्यासाठी काही केले का जात नाही ? असा प्रश्न आज या मुलीची कसरत बघताना सर्वांनाच पडला होता.


# प्रभू श्रीराम आमचे दैवत; त्यांचा अवमान सहन करणार नाही

## आ. लोणीकर : मोक्का अंतर्गत कारवाई करा

आधुनिक केसरी न्यूज







**जालना :** अखंड हिंदुस्तानातील आणी जगभरातील हिंदूंचे आराध्य दैवत प्रभू श्री राम यांच्या विषयी बोलताना शरद पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रभू श्रीराम हे जंगलात जाऊन जनावरांची शिकार करून मास खायचे अशी जहरी दंगल भडकवानारी भाषा करून अवमानकारक जहरी टीका करून देशभरातील आणि जगभरातील हिंदूंच्या भावना दुखावल्या असून प्रभू श्रीराम हे आमचे देव आहे त्यांचा अवमान आम्ही कदापिही सहन करणार नाही अशी प्रतिक्रिया राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाची विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाली की शरद पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विकृत आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या डोक्यात किडे पडलेले असून ते सतत सामाजिक समतोल बिघडून राज्यभरात आणि देशभरात दंगली घडवण्याच्या प्रयत्नात असतात या जितेंद्र आव्हाड वर मोक्का अंतर्गत देशद्रोहाचा खटला दाखल करून जेलमध्ये डांबण्याची विनंती आ. लोणीकरांनी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे केली असून आमदार लोणीकरांनी शरद पवार यांनाही विनंती करून जितेंद्र आव्हाडांना पक्षातून हकलण्याची विनंती केली आहे. पुढे बोलताना आमदार लोणीकरांनी धमकी वजा इशारा देताना जर तातडीने कारवाई झाली नाही तर जितेंद्र आव्हाड जिथे कुठे दिसेल त्या ठिकाणी तोंडाला काळ लावून बुटा चपला ने मारण्यात येईल असा इशारा सुद्धा दिला आहे.

# धर्माबाद तालुक्यातील ऐतिहासिक वास्तुशिल्पांची दुरवस्था


आधुनिक केसरी न्यूज

बाबुराव गोणारकर

धर्माबाद : तालुक्याला ऐतिहासिक वारसा लाभलेला असून आजही प्राचीन काळातील वास्तू शिल्प साक्ष देतात, पण याकडे पुरातत्व विभाग दुर्लक्ष करीत असल्यामुळे येथील प्राचीन काळातील हेमाडपंथी मंदिर, शिवमंदिर, शिलालेख, शिल्प,काळ्या दगडावर कोरीव मुर्ती आदी वास्तू शिल्पाची दुरावस्था झालेली आहे.

धर्माबाद तालुक्यातील संगम, येवती, जुन्नी, येताळा, समराळा इत्यादी गावात बाराव्या शतकातील हेमाडपंथी मंदिर, शिल्प, अवशेष, विरगळ, स्तंभ, सभामंडप, दगडावर कोरीव असलेले शिलालेख व जैन धर्माचे मुर्ती, विष्णू चे मुर्ती आहेत.पण या ऐतिहासिक असलेल्या वारसाची देखभाल केली जात नाही.बाराव्या शतकातील हेमाडपंथी मंदिर तालुक्यातील जुन्नी व संगम, येवती येथे आहे. मोठ्या प्रमाणात जुन्नी येथे विविध मुर्त्या आहेत. गावात व परिसरात खोदकाम केले तर मुर्त्याच मुर्त्या सापडतील, दगडावर कोरिव असे नक्षीकाम केलेले दगडी मुर्ती विष्णू, जैन व महादेव यांचे पिंड, नग्न अवस्थेत असलेले मुर्ती, कोरिव हत्ती, घोडे, पिंड व विविध अवशेष आहेत, एवढेच नसुन पाच ते सात फुटांची भव्य अशी पिंड आहे पण याकडे संबंधित विभाग दुर्लक्ष केले जात आहे. जसास तसे मंदिर, मुर्त्या, अवशेष पडुन आहेत. यांच्या आजुबाजुला झाडे झुडपे, गवत, वाढलेले आहेत त्या ठिकाणी केरकचराने साचलेले आहे. त्याची देखभाल केली जात नाही, येथील मंदिर, मुर्त्या, अवशेषाची दुरावस्था झाली आहे. या ऐतिहासिक असलेल्या मुर्त्या एकत्र करून जतन केले तर भावी पिढीला येथे काय होते, कोणाचे मुर्त्या आहेत हा इतिहास समजला जाईल. येथील पर्यटन स्थळ अथवा तीर्थक्षेत्राचा दर्जा दिले तर खरोखरच ऐतिहासिक इतिहास जिवंत राहिल. पण ऐतिहासिक असलेल्या वारसाची पुरातत्व विभाग व प्रशासन लक्ष देत नाहीत. केवळ पहाणी करायचे, त्यावर अभ्यास करायचे, माहिती घेयाची एवढ्या पुरतेच पुरातत्व विभाग येतात व निघुन जातात,पण त्या मुर्त्यांना सजिवंणी कशी देयाची यावर हालचाली काहीच केले जात नाही. आमदार राजेश पवार व जिल्हाधिकारी हे याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी गावकऱ्यांतुन होत आहे. भाजप तालुका अध्यक्ष विजय पाटील डांगे हे जुन्नी गावचे असुन आमदार याकडे लक्ष देतील का ? गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

२०२३ मध्ये तसा पाऊस खूप पडला. अनेक भागात तर दुष्काळाची स्थिती आहे. ऐन हिवाळ्यात पाण्याची टंचाई जाणवते आहे. शेतीमालाला भाव नाही, महागाई, बेकारी यांच्यासारखे प्रश्न आहेतच. या सगळ्या तशा पाहिल्या तर नकारात्मक बाजू आहेत सरत्या वर्षाच्या. पण जमेची बाजू फार मोठी आहे. आधीच्या वर्षांमध्ये कोरोना आणि विविध साथीच्या रोगांनी आमच्या सहनशक्तीची जणू परीक्षा घेतली. अजूनही तो धोका टळलेला नाहीच. या वर्षासह मागील काही वर्षे आमच्याकडून खूप काही घेऊन गेली. जातीजातीतील सलोखा कमी होऊन संघर्ष अधिक टोकदार झाला. राजकीय पक्षांनी तर जणू आपली विश्वासार्हता मोडीतच काढली. राजकीय नेत्यांच्या कोलांट्याउड्या पाहून सामान्य माणूस भांबावला,स्तिमित झाला. जिकडे सत्तेचे लोणी खायला मिळेल तिकडे साऱ्यांची धाव दिसून आली. एकमेकांवर अगदी क्षुल्लक कारणांवरून आरोप करून बोलताना आपली पातळी सोडल्याचे दिसून आले. आपणच यांना निवडून दिले का आणि दिले तर का दिले असाही प्रश्न पडावा अशी सगळी परिस्थिती. पण तुमच्या माझ्यासारखा सामान्य माणूस अजूनही आपली नैतिकता सांभाळून आहे, आपले मानसिक संतुलन सांभाळून आहे. जीवनाचा आनंद घेण्याची वृत्ती तशीच आहे. संकटाना, साथीच्या आजारांना तोंड देण्याची विजिगिषु वृत्ती जोपासून आहे. त्याची उमेद, त्याचा उत्साह सरत्या वर्षाने हिरावून घेतलेला नाही. ती संकटे, त्या गोष्टी त्याला पराभूत करू शकल्या नाहीत ही सगळ्यात मोठी जमेची बाजू आहे. आणि हीच सरत्या वर्षाची भेट आहे.






# आनंदी पहाट

## नियोजनबद्ध दिनचर्या अधिक सक्रिय करते

आधुनिक केसरी

आपली दैनंदिन दिनचर्या कशी तयार करावी आणि त्यावर कसे चिकटून राहायचे हे अनेकदा आपण अभ्यासपूर्वक समजून घेत नाही. त्याची तयारी करण्यासाठी काही वेळ लागू शकतो. आपल्या परिपूर्ण दैनंदिन दिनचर्येत काय असावे, ते आपापल्या गरजांवर अवलंबून असते. आपल्याला काय आणि कधी करायचे आहे त्याचा सातत्याने शोध चालू ठेवला पाहिजे. आपण आपल्या मानसिक, शारीरिक क्षमता आणि वेळेचे व्यवस्थापन करण्याच्या क्षमतांसह आपल्या जीवनशैलीबद्दल प्रामाणिक असणे आवश्यक असते. ज्याला आपण चिकटून राहू शकतो. दैनंदिन दिनचर्या कशी लिहायची हे शोधून काढणे, आपल्याला दररोज पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली प्रत्येक गोष्ट, घरी आणि कामावर लिहून ठेवून मगच करण्याची सवय लावून घ्यावी. आपण दररोज करत असलेल्या सर्व गोष्टी तसेच आपण पूर्ण करायला हव्यात त्या सर्व गोष्टी लिहून ठेवाव्यात. एकाच वेळी सर्व कामे लक्षात ठेवणे खूप कठीण असते. दिवसभर करायच्या कामाची टिपणे लिहिण्यास्ठी एक छोटी नोटबुक जवळ ठेवावी. जर आपल्याला दैनंदिन दिनचर्येत "मोबाईल बिल भरणे" हे काम करायचे असेल, तर त्याची यादीत नोंद करून ठेवावी. दैनंदिन दिनचर्या हा स्वतः योग्यवेळी योग्य काम करण्याचा उत्तम मार्ग आहे. आपण जितके जास्त काळ टिकून राहू, तितकेच प्रत्येक कार्य एक सवय बनते. आपल्याला प्रेरणेसाठी कमी संघर्ष करावा लागतो. आपल्याला ठरवलेले काम करण्यात अडचण येत असल्यास लहान बदलांसह सुरुवात करावी; आपण कशामध्ये कमी पडतो हे शोधण्यासाठी प्रयत्न करावा. आपण करत असलेल्या प्रत्येक गोष्टीची नोंद करण्यात एक दिवस घालवला तरीही ते उपयुक्तच ठरते. कॅलेंडर ॲपसह प्लॅनर, नोटबुक किंवा मोबाईल फोन जवळ बाळगत असतो. त्याचा उपयोग आपल्याला वेळोवेळी निरनिराळ्या नोंदी करण्यासाठी होऊ शकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### मुक्तीचे आंदन | देई मुक्ता ||

सुटावी उपाधी | लागावी समाधी ||
ज्ञानेशाची आधी | ओवी व्हावे ||१||
तुकाचा गजर | अभंगात गावा ||
एकरूप व्हावा | आत्माराम ||२||
नाम्याचा महिमा | नामाने जिंकावा ||
विठ्ठल कोंडावा | काळजात ||२||
अलंकार ल्यावा | भक्तीचा जीवाने ||
दाविला शिवाने | नरहरी ||३||
नाथाची गौळण | संतांची राखण ||
भारूड गोंदन | जन्मा लाभे ||४||
मीरेची भक्ती | जनीचे दळण ||
मुक्तीचे आंदन | देई मुक्ता ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरूपण


आधुनिक केसरी

लांव तरी ते माया ।काय कराविया सहश्र जाया ।
परी भुलोन गेलों वायां ।मकरध्वजाचेनी ॥३९॥
या येका कामाकारणें ।जिवलगांसिं द्वंद घेणें ।
सखीं तींच पिसुणें ।ऐसीं वाटतीं ॥४०॥
म्हणौन धन्य धन्य ते प्रपंची जन ।जे मायेबापाचें भजन ।
करिती न करिती, मन- ।निष्ठुर जिवलगांसीं ॥४१॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

गो विषयन निज निज खिंचैं,
निर्बलता है ताहि ।
दम साधन याते कहा,
प्रथम सबल होय जाहि ।।१२७।।
(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय)
०६/०६/१२७

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : इंद्रियांना त्यांचे विषय स्वतःकडे आकर्षित करतात. त्यामुळे त्यांच्यात निर्बलता येते. म्हणून ग्रंथकारांनी सर्वप्रथम दम ची साधना प्रभू-भक्तांसाठी आवश्यक आहे असे सांगितले आहे, ज्यामुळे ते बलवान होऊन शरीर स्वस्थ राहिल. शरीर स्वस्थ आणि निरोग राहाणे योग-अभ्यासींसाठी परम आवश्यक आहे, कारण 'शरीरमाद्यंखलुधर्मसाधानम्' , अर्थात शरीरच सर्वप्रथम सर्व धर्मांचं साधन आहे. शरीर रोगग्रस्त आणि निर्बल असल्यास दैनंदिन कर्त्तव्यांचेही पालन होऊ शकणार नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

# काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ५९वे

श्रीमहाराज असतांना काशीत ।म्हणती, सांग माय, काय तुझ्या मनात ।ठेवू नको काही मनात ।करीन तुझ्या ईच्छा पूर्ण ।। १ ।।
गीतामाईने सांगावे ।आईचे ते सारे ऐकावे । तैसेचि करावे। महाराजांनी काशीत ।। २ ।।
महिनाभराने आईला घेऊन निघाले ।ते गयेला आले ।पिंडदान विधी करून झाले । मग अयोध्येस गेले ।। ३ ।।
गाव गोंदवले ।दीड महिन्यांपूर्वी सोडले ।सारे ठीक ठाक चाललेले ।मुक्कामात सगळ्या ।। ४ ।।
सारे अयोध्या मुक्कामी आले ।गीतमाईस थकल्याचे वाटले। दोन दिवस तसेच काढले ।वाटले, पडेल आराम ।। ५ ।।
नंतर मात्र त्या पडून राहिल्या ।नाम घेणे सुरू असे पडल्या पडल्या । तब्येतीने मात्र क्षीण होत गेल्या ।महाराज असती बसून आईच्या सेवेसाठी ।। ६ ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# ज्याला समाधान तो भाग्यवान

आधुनिक केसरी

ज्याचे ‘ हवेपण ’ जास्त असते तो गरीब जाणावा, आणि ज्याचे हवेपण कमी असते तो श्रीमंत जाणावा. परमार्थी म्हणजे भिकारी असे ज्याला वाटते, त्याला श्रीमंतीची खरी कल्पनाच नाही. ज्याला नेहमी समाधान वाटते तोच खरा श्रीमंत. आमचा आधार पैशाचा; तो आज आहे अन् उद्या नाही. पायाच जिथे डळमळीत तिथे इमारत कुठे पक्की होईल ? श्रीमान् याचा अर्थ भगवंताशिवाय श्री असणारा असा होऊ नये, याची श्रीमंतांनी काळजी घ्यावी. खरे म्हणजे समाधान हाच खरा पैसा, हीच खरी श्रीमंती, हेच खरे भाग्य, आणि हेच खरे ऐश्वर्य होय. ज्याला समाधान जास्त, तो जास्त भाग्यवान समजावा. समाधान हे आपले आपल्याला घ्यायचे असते, दुसरा कोणी ते आपल्याला देऊ शकत नाही. खरोखर, समाधानासारखे औषधच नाही. ते मिळत नाही म्हणून इतर औषधे घ्यावी लागतात. काळजी नाहीशी झाली की अखंड समाधान, शांती आणि आनंद मिळतो. पैलवानासारखा दिसणारा एक गृहस्थ होता, त्याला विचारले तर तो म्हणाला, “ अहो, मला मधुमेह झाला आहे; मी आतून पोखरला गेलो आहे ! त्यापेक्षा तुम्ही बरे. ” खरोखर, त्याचप्रमाणे पैशापासून प्राप्त होणाऱ्या ऐश्वर्याची अवस्था आहे. फक्त भगवंताच्या निष्ठेमध्ये समाधान आहे. ते राजवाड्यामध्ये नाहीच नाही, पण ते झोपडीमध्येही नसेल. असमाधान हा रोग सर्वांनाच असल्यामुळे रोगांच्या यादीतून त्याचे नावच निघून गेले आहे ! सध्या जगात पुष्कळ सुधारणा झालेल्या आहेत. पण त्यांनी माणसाला समाधान मिळालेले नाही. जीवन सुखी न होता मनाला जिच्यामुळे हुरहुर लागते ती सुधारणा कसली ? व्यक्ती काय किंवा समाज काय, यांची सुधारणा घडवून आणायला चित्त स्थिर झाले पाहिजे. चित्ताची ही स्थिरता धर्माशिवाय येणे शक्य नाही. हल्लीचे तत्त्वज्ञान नुसते अभ्यासी आहे, अनुभवाचे नाही; म्हणून त्याने खरे समाधान लाभणार नाही. खरोखर, प्रत्येक जीवाला भगवंताची तळमळ लागली पाहिजे. भगवंताशिवाय जो राहतो त्याला सुखदुःख येते; आणि सुख म्हणजे तरी काय, दुःखाची कमतरता ते सुख ! राजापासून रंकापर्यंत प्रत्येकाला काहीतरी मिळावेसे वाटते; म्हणजे प्रत्येकाला काहीतरी कमी आहे. पण कुणी असा विचार करीत नाही की, जे आज कमी आहे ते पूर्वी आपल्याजवळ असताना तरी आपण सुखी होतो का ? याचे उत्तर ‘ नाही ’ असेच मिळते. ताजी जिलबी कल्पनेने खाण्यापेक्षा शिळ्या जिलबीचा तुकडा प्रत्यक्ष खाण्यामध्ये जास्त समाधान आहे. बुद्धीचा आनंद हा उपाधीचा आणि कल्पनेचा आनंद आहे, भगवंताचा आनंद हा उपाधिरहित आहे. हा आनंद मिळवायला भगवंताला शरण जाऊन त्याच्या नामात राहणे हा एकच उपाय आहे.



# गहिनीनाथ

आधुनिक केसरी

तेव्हा अस्थी, त्वचा, मांस, रक्त इत्यादी सर्व होऊन मनुष्याचा तेजःपुंज पुतळा बनला. मग तो रडू लागला. हा आवाज जवळ असलेल्या मुलांनी ऐकिला. तेव्हा गोरक्षनाथाने भूत आणिले. असा त्या मुलांनी बोभाटा केला व लागलेच सर्वजण भिऊन पळून गेले.



आव्हाडांनी प्रभु रामचंद्रालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले पान ६


आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, ५ जानेवारी २०२४


# लावणी महाराष्ट्राची लोककला : सविता राणी पुणेकर

## तमाशा सादरीकरणाला वेळेचे बंधन आल्याने सादरीकरणाचा खरा आनंद मिळत नाही

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**लोणी खुर्द :** पेशवाई काळापासून महाराष्ट्रात तमाशा हे मनोरंजनाचे मुख्य साधन मानले जाते. माञ सरकारने वेळेचे बंधन घालुन दिल्याने तमाशा कलावंताची आधोगती होत आहे. तसेच प्रेक्षकांची अभिरुची बदलल्याने गण, गौळण, भारुड पोवाडे, वगनाट्य आदी सांस्कृतिक कार्यक्रमांना बगल देऊन प्रेक्षकांच्या मागणीनुसार हिंदी मराठी चित्रपटाच्या गाण्यावर कार्यक्रम सादर करावे लागतात. पूर्वी वगनाट्य हे तमाशाचे मुख्य अंग होते. तमाशा सादरीकरणाला वेळेचे बंधन आल्याने सादरीकरणाचा खरा आनंद मिळत नसल्याची खंत सविता राणी पुणेकर यांनी वैजापूर तालुक्यातील लोणी खुर्द येथे व्यक्त केली.




सध्याच्या डिजीटल जमान्यात गण, गौळणबरोबरच नवीन नवीन गाणी प्रेक्षकांच्या मागणीबरोबर सादर केली जात आहेत. वगनाट्यामध्येही बदल घडवून नवनवीन विषय हाताळले जात आहेत. प्रेक्षकांतून पिच्चर टॉकीजपेक्षा तमाशा मंडळांना मोठी मागणी असून याञा आठवडे बाजार अशा ठिकाणी एक दिवस तमाशामंडळ मुक्कामी थांबत आहे. 110 कलाकारांचा संच घेवून तमाशा कलेच्या माध्यमातून मनोरंजनाबरोबर समाजप्रबोधन आलेले तमाशा मंडळे करत आहेत.

खर्च आणि उत्पन्न यांचा ताळमेळ बसत नसल्यामुळे महाराष्ट्रातून सर्कस हद्दपार झाली त्याप्रमाणे तमाशा लोककला थोड्याच दिवसात हद्दपार होणार असल्याचे सांगितले. 50 तमाशा 7 फड चालू असून तेही शेवटच्या घटका मोजत आहेत. शिवाय सततच्या फिरतीमुळे शासनाकडुन मिळणार्या आनेक सोई सुविधा तसेच योजनांच्या लाभापासुनतमाशातील कलावंत दुर राहत आहेत. पूर्वापार चालत आलेली महाराष्ट्राची लोककला जिवंत ठेवण्यासाठी तसेच कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी यातमाशाकलावंताना महाराष्ट्र फिरवावेत लागते. त्यामुळे मुलाबाळांच्या शिक्षणाचे यामुळे नुकसान होते. दर्जेदार शिक्षण घेण्याची कितीही ईच्छा आसली तरी त्यांच्या मुलांना शिक्षण मिळत नासल्याने शेवटी त्यांची मुले तमासगीरच होत आहे. कलावंताना स्वतःचे घर व जमीन नसल्यामुळे उतार वयात हाल होतात माञ मजबुरी आणी तमाशाची आवड असल्याने आमच्यासारखे हजारो तमाशा कलावंत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन मनोरंजनाच्या माध्यमातून जनजागृतीचे काम करत आहे. त्यामुळे कलावंताचे सर्वेक्षण करुन कलावंताना मनधन द्या जेनेकरुण कलावंतांना सन्मानाने जगता येईल आणि महाराष्ट्राची लोककला जिवंत ठेवण्यासाठी कलावंत मनापासून घडपड करतील पण त्यासाठी मायबाप सरकारने मायेचा हात कलावंतांच्या पाठिवर पडणे आवश्यक आहे आसे सविता राणी पुणेकर यांनी आधुनिक केसरीशी बोलतांना सांगितले. यावेळी लोणी गावच्या वतीने सविता राणी पुणेकर यांचा कालाकाराच शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सविता राणी पुणेकर यांच्या अदाकारींसह लावण्यांचे दिमाखात सादरीकरण करण्यात आले. सांस्कृतिक क्षेत्राला उभारी देण्यासाठी लावणी ही महाराष्ट्राची एक पारंपरिक लोककला असून आजही जनसामान्यांना ही लोककला आपलीशी वाटते, ग्रामीण भागात आजही यात्रा उत्सव,आठवडेबाजार यासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमात लावणी हा कलाप्रकार मोठ्या आवडीने बघितला जातो. दिलखेचक अदाकारीने बहारदार, एक पारंपरिक व लोकांना आवडणारी लोककला असल्याने ती जपली पाहिजे, असे मत सविता राणी पुणेकर यांनी व्यक्त केले. आधुनिक युगात लावणी ही लोककला वेगळ्या वळणावर चालली आहे. मुळ लावणी कला प्रकाराला आता उभारी देण्यासाठी या लोककलेला राजाश्रय मिळणे गरजेचे आहे. कारण लावणी महाराष्ट्राची शान आहे. रसिक मायबापाचे प्रेम आहे. यावेळी सरकाने वाहन चालकांवर केलेल्या कठोर कायद्याला विरोध आसुसून आमचा ड्रायव्हर संघटनेला आमचा पाठिंबा आहेत म्हणून ड्रायव्हरसाठी भरुन चालली माझी मंजुळा, ड्रायव्हरला जीव थोडा लाव, पाटलांचा बैलगाडा, कच कांदा, आला. राजसा जगडी बसा, जीव हा पिसा', 'खेळताना रंग बाई होळीच्चा, काट लागे कोना माझा चोळीचा', 'इच्चार काच हाय तुमचा, पाहुणे विचार काय हाय' ही लावणी सादर केली. 'कारभारी जरा दमान' ही लावणी सविता राणी पुणेकर यांनी दिलखेचक अदाकारीने सादर करत प्रेक्षकांची दाद मिळवली. टाळ्या वाजवुन लावण्यांना दाद दिली. नृत्याचा मनमुराद आनंद लुटला. टाळ्या, शिट्या वाजवित मनमुराद आनंद लुटला. काही लावण्यांच्चा 'वन्समोअर' ही झाला.

# उमरी येथील अवैध धंदे बंद करा; अन्यथा २६ जानेवारी रोजी आत्मदहनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** शहरातील गुटखा, मटका,



क्लब, पत्याचे डाव हे अवैध धंदे खुलेआम चालू आहेत. अवैधधंदे, जुगारच्या आहारी जाऊन बरेच सुशिक्षित बेरोजगार तरुण याच्या आहारी जाऊन बर्बाद होत आहेत. यामुळे उमरी शहरातील कायदा सुव्यवस्था बिघडली असून शहरातील संपूर्ण अवैध धंदे बंद करा, अन्यथा २६ जानेवारी रोजी मोंढा भागात आत्मदहन करण्याचा इशारा टायगर ग्रुपचे उमरी तालुका अध्यक्ष साईनाथ खांडरे यांनी असुन यासंदर्भात उमरीचे पोलिस निरीक्षक विश्वनाथ झुंजारे यांना निवेदन देण्यात आले. उमरी शहरातील मध्यवर्ती भागातील धार्मिक स्थळासमोर असलेल्या महादेव मंदिरासमोरील इमारतीमध्ये पपतु आणी अंदर-बाहर नावाचा जुगार चालू आहे. उमरीच्या मच्छीमार्केटमध्ये शासन मान्यता असल्या सारखे शटरच्या दुकानातून मटक्याची बुक्की जोमाने चालू आहे. तसेच गुटख्याची वाहतूक, अँटी, स्कूटी, मोटार सायकलवरून पोत्याने सुरु आहे. हे सर्व अवैधधंदे २६जानेवारी पर्यंत बंद झाले नाहीतर मोंढा मैदान येथे राष्ट्रध्वजाजवळ आत्मदहन करण्याचा इशारा टायगर ग्रुपचे उमरी तालुका अध्यक्ष साई खांडरे यांनी पोलिस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# वैजापुरात आलेल्या दौलताबाद ते शिर्डी पायी साईबाबा पालखी दिंडीचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** दौलताबाद येथील साईभक्त मंडळ यांची शिर्डीला जाणारी पायी दिंडी वैजापूर शहरात बुधवार(ता.०४) रोजी येताच शहरातील या पालखीचे स्वागत पालिकेचे माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, संजय राजपूत, सौ. नम्रता राजपूत तसेच काटे मारुती मंडळ, परदेशी गल्ली येथील साईबाबा भक्त मंडळाने बँड पथक व साईबाबा की जय अशा जय घोषणा देत केले. पोष्ट ऑफिस मार्गे जुनी भाजी मंडी, महाराणा प्रताप रोड, परदेशी गल्ली ते काटे मारोती मंदिर पर्यंत दाराबाहेर सडा, रांगोळ्या व फुलांची उधळण,व साईबाबांच्या मूर्तीची आरती करत स्वागत महिला व पुरुषांनी स्वागत व आरती केली. रस्त्याच्या दुतर्फा महिला व पुरुष मंडळींनी साईबाबाचा जय घोष करीत स्वागत केले. या प्रसंगी वैजापूरचे प्रति साईबाबा धोंडीरामसिंह राजपूत यांनी साईबाबांची वेषभूषा धारण करून शिर्डी च्या साईबाबाचे साक्षात दर्शन घडविले, त्यांना अण्णा अधिकार व राजेंद्र वडनेरे यांनी सहकार्य केले. डॉ. दिनेश परदेशी, संजय राजपूत, सागर राजपूत, प्रेम राजपूत, जितू राजपूत, शुभम राजपूत, रवी लूटे व मित्र मंडळ, परदेशी गल्ली मित्र मंडळ दिनेश राजपूत, रामदास मुरलीधर इंगळे,रवी बाविस्कर, नम्रता राजपूत, नारायण राजपूत यांनी सहभाग नोंदविला. संजय व म्रता राजपूत गत १३ वर्षांपासून या दिंडीचे स्वागत, त्यांची निवास व्यवस्था, साई महा प्रसाद देऊन सेवा करीत आहेत. गुरुवारी सकाळी सहा वाजता ही पालखी शिर्डीला रवाना झाली.

# 'खिचडी' कोण शिजविणार ?

## जिल्हा प्रशासन म्हणते प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर येणार: कृषी विभाग म्हणतेय त्यांचे असिस्टंट शिजवणार

आधुनिक केसरी न्यूज

**धनंजय साखरकर**

**चंद्रपूर :** जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना फार काही चविष्ट खिचडी मिळत नाही.या खिचडीचा दर्जाला घेऊन पालकांनी अधूनमधून तक्रारी केल्या आहेत.आता मात्र याच खिचडीची भारी चर्चा चंद्रपुरात सुरु आहे.चर्चा होण्याचे कारण एवढेच की ही खिचडी प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर शिजविणार असं जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आलं. मात्र कृषी विभागाने याला नकार दिला.विष्णू मनोहर स्वतः येणार नसून त्यांचे असिस्टंट खिचडी शिजविणार, असं सांगण्यात आलं.ही साधी खिचडी. फरक एवढाच की 6500 किलो ही खिचडी शिजवीली जाणार आहे. मात्र या खिचडीला घेऊन जिल्हा प्रशासन फारच गंभीर असल्याच दिसतंय. या खिचडीला राजकीय इव्हेंट म्हणून पुढे केले जातेयं,अशी चर्चा जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात सुरू आहे. मागील दोन महिन्यापासून जिल्हा प्रशासनाकडून महत्त्वाचे उपक्रम राबविल्या गेलेत.मात्र या उपक्रमातून एका विशिष्ट राजकीय व्यक्तीला प्रमोट केल्या गेल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. अश्यात जिल्हा कृषी महोत्सवात उद्या ( शुक्रवार ) 6500 किलोची खिचडी शिजविली जाणार आहे.खरंतर हा महोत्सव शेतकऱ्यांचा. शेती पूरक व्यवसाय करणाऱ्यांचा. तसे फार चांगले इथं स्टाल लागलेले आहेत.मात्र चर्चा आहे ती खिचडीची. ही खिचडी तरी राजकीय इव्हेंट ठरू नये, अशी माफक अपेक्षा सर्वसामान्य लोकांची आहे.

**अशी आहे तयारी :** बाजरी हे मिलेट धान्य .या सोबतच सर्व भाज्यांचा वापर करून पुर्णान्न असलेली खिचडी तयार होणार आहे .यासाठी 10 फूट व्यासाची, 5 फूट कढई वापरली जाणार आहे . त्याकरिता सुमारे 500 किलो लाकूड वापरला जाईल . विष्णू मनोहर यांनी या आधी दिल्ली येथे 5 हजार किलोची ‘ समरसता खिचडी ’ तयार केली होती . तसेच खिचडीला राष्ट्रीय अन्न घोषित करावे, या मागणीसाठी नागपुरातील महाल भागात त्यांनी 5 हजार किलोची खिचडी तयार केली होती . नुकतेच वनवासी कल्याण आश्रमाच्या डीलिस्टींग कार्यक्रमासाठी त्यांनी 10 हजार किलो मसालेभात व नागपुरातील खासदार सांस्कृतिक महोत्सवात विष्णू मनोहर यांनी श्री . गजानन महाराजांना 6500 किलो खिचडीचा नैवेद्य सादर केला होता, असे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे .

# तृणधान्य खा, व्हायरसपासून दूर रहा; कृषी साहाय्यक मानसिंग भोळे यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कोरोना व्हायरसमुळे सर्व जग घरात बसले होते. परंतु आपल्या शेतकऱ्याकडे पाहा, त्याला असे कितीतरी व्हायरस माहिती आहेत. शेतामध्ये विविध पिके असतात. त्यावर सतत काही ना काही कीड, रोग पडत असतो. हे व्हायरसच असतात. त्यावर उपाय काय करायचे,हे देखील शेतकऱ्याला माहीत असते. कोरोना व्हायरस असताना लॉकडाऊन केले. ते करण्याची गरज नव्हती, असे मत ज्येष्ठ कृषी तज्ज्ञ डॉ. बुधाजीराव मुळीक यांनी व्यक्त केले. तृणधान्य खा आणि व्हायरसपासून दूर राहा, असी माहिती कृषी सहाय्यक मानसिंग भोळे कृषी सहाय्यक अर्जुन सुरडकर कृषी विभाग सोयगाव यांनी दिली.

कृषी सहाय्यक मानसिंग भोळे म्हणाले पूर्वी आपल्याकडे तृणधान्यच खाद्य होते. नंतर ब्रिटिश आले आणि त्यांनी मग इतर धान्य आपल्याकडे आणली. तेच आज आपण खात आहोत. त्यातून पोषक घटक तृणधान्याएवढे मिळत नाहीत. परिणामी अनिक अनेक आजार होतात. पण, तृणधान्य खाल्ले तर आपल्यातील प्रतिकारशक्ती वाढते. आपल्याला आजार होत नाहीत. सर्वात अधिक प्रथिने या तृणधान्यात असतात. प्रत्येक क्षणाला साखरेची गरज असते. विनाकारण आपण साखरेला बदनाम केले आहे. पण, अक्रिोणतीही गोष्ट अति प्रमाणात चांगली नसते.भोळे म्हणाले की, आपण म्हणतो साखर खात नाही पण ज्वारी, बाजरी खाल्ली तरी पोटात जाऊन त्याची साखरच होते. कारण प्रत्येक पेशीला शर्करा हवी ज्वारी, बाजरी, राळ, नादणी आदींचा तृणधान्यात समावेश होतो.

# वैभव नाईकांची टीका

आधुनिक केसरी

मंत्री नारायण राणे व उदय सामंत हे दोघे सोयीनुसार वेगवेगळी मंगळसूत्र बांधत असतात, अशी बोचरी टीका शिवसेना ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांनी केली. माध्यमांशी संवाद साधताना ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांनी भाजप आमदार नितेश राणे यांनी केलेल्या टीकेला उत्तर दिले. नारायण राणेंना शिवसेनेने मुख्यमंत्री केले. सायकल चोरी करणाऱ्यांनाही शिवसेनेमुळे मानाची पद मिळाली असून ते मोठ्या मोठ्या गाड्यातून फिरू लागले असल्याचे नाईक यांनी म्हटले. बाळासाहेब ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या वर आमची निष्ठा असल्यामुळे आम्ही त्यांच्यासोबत आहोत, असेही त्यांनी म्हटले. नाईक यांनी म्हटले की, आज रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात शिंदे गटाचे अस्तित्व काय आहे हे नितेश राणेंनी सांगितले. या मतदारसंघात शिंदे गटाला कधीही उमेदवारी मिळणार नाही. तर दीपक केसरकर आणि उदय सामंत येणाऱ्या निवडणूकीत भाजपच्या चिन्हावर निवडणूक लढवतील असा दावा त्यांनी केला. रत्नागिरी सिंधुदुर्ग मतदारसंघावर शिवसेना शिंदे गट आणि भाजपने दावा केला आहे. या जागेवरून उदय सामंत यांचे बंधू किरण सामंत शिंदे गटाकडून निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे. नितेश राणे यांनी म्हटले की, 13 खासदार हे एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले आहेत. ती जागा शिंदे गट लढवणार आहे. मात्र, सिंधुदुर्ग-रत्नागिरी मतदारसंघावर कोणाचाही दावा नाही. ज्याची ताकत जास्त आहे. त्यालाच ती जागा मिळेल असे राणे यांनी म्हटले. या मतदारसंघात भाजपची 7 लाख मते असल्याचे त्यांनी म्हटले. रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघावर भाजपचा डोळा आहे. भाजप रवींद्र चव्हाण यांना मैदानात उतरवण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आले आहे. तर शिवसेनेकडून किरण सामंत यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात तयारीला लागण्याचे रवींद्र चव्हाण यांना वरिष्ठांनी आदेश दिल्याचे वृत्त आहे.

# शिक्षणमंत्र्यांसमोर शाळा बंद पडू न देण्याचे आव्हान !



जगन घाणेकर
मुंबई, ९६६४५५९७८०

आधुनिक केसरी

**राज्य सरकार शाळा बंद करणार आणि बार्सना परवानगी देणार या आशयाच्या बातम्या मध्यंतरी प्रसिद्ध झाल्या होत्या त्यावर शिक्षणमंत्री दीपक केसरकर कडाडले होते. या सर्व अफवा असून राज्यातील एकही शाळा बंद पडू देणार अशी घोषणा त्यांनी त्यावेळी केली. याच घोषणेचा उच्चार मागील काही महिन्यांपासून ते जिथे जात आहेत तिथे करत आहेत. गेल्या महिन्यात पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनातही त्यांनी याचा पुनरुच्चार केला.**

राज्यातील मुला -मुलींनी शिक्षणापासून वंचित राहता काम नये यासाठी शिक्षणमंत्र्यांना असलेली तळमळ कौतुकास्पद आहे. आजमितीला महापालिका शाळांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिदिन पोषण आहारासह शिक्षणासाठी लागणारे सर्व साहित्य शासनाच्या वतीने मोफत देण्यात येते. शाळेच्या दप्तरापासून गणवेश, वह्या, पुस्तके, कंपासपेटी, पेन्सिल, खोडरबर, रेनकोट, सॅंडल, मोजे, रुमाल सर्व काही विनामूल्य मिळते त्यामुळे पालकांना कोणतीही वस्तू पदरचे पैसे खर्च करून विकत आणावी लागत नाही. शाळांमध्ये पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह, खेळाचे मैदान यांचीही सोय बऱ्यापैकी असते. बदलत्या काळानुसार मुलांना संगणक प्रशिक्षण देण्यासाठी प्रत्येक शाळांत संगणकांचीही व्यवस्था करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची पुरेपूर काळजी सरकारने घेतली आहे. आमच्या काळात महानगरपालिका शाळेत केवळ सातवीपर्यंत शिक्षण दिले जात होते; मात्र एकेका इयत्तेचे चार चार वर्ग भरत असत. मागील काही वर्षांत शिक्षण क्षेत्रात खासगी शाळांचे वर्चस्व प्रस्थापित झाल्यामुळे महापालिका शाळांचा पट कमालीचा घसरू लागला, त्यामुळे महापालिकेने शाळांतून इयत्ता दहावीपर्यंत मोफत शिक्षण देण्यास सुरुवात केली. मुलांना इंग्रजी माध्यमांत शिक्षण देण्याकडे पालकांचा वाढता कल लक्षात घेऊन महापालिकेने इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणेही सुरु केले. आजमितीला मराठी शाळांच्या तुलनेत इंग्रजी माध्यमांच्या शाळांना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. एव्हढ्या सर्व सुविधा देऊनही मराठी माध्यमातील विद्यार्थी पट वाढवण्यास महापालिकेला सातत्याने अपयशच येत आहे. यामागे पालिकेची धोरणेही कुठेतरी आड येत असल्याचे लक्षात येते. ज्या शाळांचा विद्यार्थी पट कमी आहे, अशा शाळांमध्ये दोन इयत्तांची मुले एकत्र बसवली जातात. त्यामुळे शिक्षक शिकवत असलेला भाग ग्रहण करताना दोन्ही इयत्तांच्या मुलांचा गोंधळ होतो. ही कसरत अंगवळणी पडण्यामध्ये शैक्षणिक वर्षाचा काही काळ निघून जातो. शाळांना पुरवण्यात येणारे शिक्षक हे इयत्तांच्या संख्येनुसार न देता शाळेतील पट संख्येच्या अनुसार दिले जातात. त्यामुळे काही इयत्तांना शिक्षकच मिळत नाहीत. एखादे शिक्षक दीर्घकालीन सुट्टीसाठी जातात तेव्हाही त्या इयत्तेला शिक्षक नसतात. याशिवाय कोणत्या ना कोणत्या ट्रेनिंगच्या नावाखाली आठवडा-आठवडाभर शिक्षक शाळांत अनुपस्थित असतात अन्य शिक्षकांकडे आधीच दोन दोन इयत्ता असल्याने ते तरी अनुपस्थित शिक्षकांचा वर्ग कसा सांभाळणार ? शिक्षक नसलेल्या इयत्ताना शिक्षक मिळवून



देण्यासाठी पालकांनाच महापालिका कार्यालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागतात. काही शिक्षक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान नको म्हणून सुट्टीवर जाण्याआधी समाजातील खासगी शिक्षकाला पदरचे पैसे देऊन वर्ग घेण्यासाठी तात्पुरती सोय करतात, तर बरेच शिक्षक तेव्हढीही तसदी घेत नाहीत. महापालिका मर्यादेपेक्षा अधिक शिक्षक नेमू शकत नसल्याने महापालिकेचे शैक्षणिक अधिकारीच पालकांना खासगी शिक्षकाची व्यवस्था करण्यास सांगतात. या शिक्षकांचे मासिक वेतन शाळेतील महापालिकेच्या पे रोलवर असणाऱ्या शिक्षकांना दर महिन्याला आपल्या खिशातून भरावे लागते. पालिका अधिकाऱ्यांनी तात्पुरत्या स्वरूपात खासगी शिक्षक उपलब्ध करून दिले, तरी त्यांची बदली केव्हा होईल हे सांगता येत नाही. शिवाय या तात्पुरत्या शिक्षकांना ३-३ महिने वेतन मिळत नसल्याने आणि ते मिळवण्यासाठी यांना महापालिका कार्यालयात अनेक खेपा माराव्या लागत असल्याने हे तात्पुरते शिक्षकही पालिकेच्या व्यवस्थेवर नाराज असतात. शिक्षक नसलेल्या वर्गावर दुसरे शिक्षक उपलब्ध करून मिळेपर्यंत विद्यार्थ्यांच्या पालकांना भरपूर संघर्ष करावा लागतो. ज्यामध्ये बराच कालावधी निघून जातो. या काळात विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी शिक्षकच नसल्याने मुले मस्ती करण्यात दिवस घालवतात. जे शिक्षक महापालिकेने शाळांना दिले आहेत त्यांना शाळांच्या वेळेत इतरही प्रासंगिक कामे दिली जात असल्याने शिक्षक मुलांना शिकवणे सोडून ही कामे करत बसतात त्यामुळे पुन्हा विद्यार्थ्यांचे नुकसानच होते. गेल्या मासात आतापर्यंत शाळेत शिकून गेलेल्या मुलांच्या जातीच्या नोंदी महापालिकेकडून मागवण्यात आल्याने काही शिक्षक आठवड्याहून अधिक दिवस या नोंदी शोधायचे काम करत होते. खेळून कंटाळा आल्याने आणि अनेक दिवस शाळेत जाऊन शिक्षणच न मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या मनातही नकारात्मक विचार येऊन मुले शाळेत जाण्यास अनिच्छा दाखवू लागतात. त्यामुळे पालकांना त्याचा ताण येतो. शहरातील बहुतांश सरकारी शाळांची स्थिती थोड्याफार प्रमाणात अशीच आहे. सरकार मुलांना सर्व प्रकारच्या सुविधा तर देत आहे; मात्र ज्यासाठी विद्यार्थी शाळेत येतात ते शिक्षणच व्यवस्थित न मिळाल्याने विद्यार्थीही शाळा बदलण्यासाठी पालकांकडे हट्ट करू लागतात. आपल्या पाल्याचे शैक्षणिक नुकसान नको म्हणून पालकही सरकारी शाळेतून पाल्यांचे नाव काढून आर्थिक परिस्थिती नसताना त्यांना खासगी शाळेत भरती करतात. दरवर्षी असे अनेक विद्यार्थी महापालिका शाळांतून नाव कमी करून खासगी शाळांत जाऊ लागले आहेत. शालेय विद्यार्थ्यांना सुखसुविधा मिळण्यासाठी शासन ज्या प्रमाणात निधी खर्च करत आहे त्यातील काही निधी शाळांना दर्जेदार आणि पुरेसे शिक्षक देण्यासाठी खर्च केला, तर मुलांमध्येही शिक्षणाची आणि शाळेची आवड निर्माण होईल. ज्यामुळे विद्यार्थ्यांचे पालक समाधानी होऊन तेच शाळेतील विद्यार्थी पट वाढवण्यास स्वतःहून पुढाकार घेतील आणि महापालिका शाळांना लागलेली घरघर थांबण्यास मदत होईल. नवीन वर्षात शाळा बंद पडू द्यायच्या नसतील, तर सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अन्य सुविधांसोबत शाळेतील शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचे मोठे आव्हान शिक्षणमंत्र्यांसमोर असेल आणि त्यासाठी शाळांना पुरेसे शिक्षक पुरवणे क्रमप्राप्त आहे.

**(माझा मुलगा मुंबईतील महापालिका शाळेत शिक्षण घेत असून वरील लेख स्वानुभवातून लिहिला आहे.)**

# निवड ही उत्कर्ष घडविणारी असली पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**ज्ञान हाच जीवनातील प्रत्येक निवडीचा आधर असेल तर कोणत्याही प्रकारची निवड ही सार्थ ठरते. अज्ञानावर आधारीत प्रत्येक निवड पश्चात्ताप घडवून आणते. निवड ही जीवनाचा उत्कर्ष करणारी असली पाहिजे तरच ती जीवन हितार्थ ठरते. वय आवड आणि निवड यानुसार हित किंवा अहित निर्धारित होत असत. जीवन उदिष्ट जसं असतं तशीच आपली आवड निवड असते. उत्कर्ष होईल अशी आवड निवड निर्माण होण्यासाठी जीवन उत्कर्षाच ज्ञान देखिल असण गरजेचं असतं. मानवी जीवन जीवनातील हित अहित चांगलं वाईट शाश्वत भौतिक आणि जीवनाचं अंतिम सध्या ज्याला समजलं त्याची आवड योग्यच असते आणि पर्यायाने निवड देखिल उत्कर्ष होणारीच होते.**

आपल्या ज्ञान उंची नुसार आपली निवड निर्धारीत होत असते. हे अगदी वास्तव आहे. हिच निवड जीवन प्रवासातील पुढील दिशा दशा निश्चित करत असल्याने आपलं आयुष्य आणि भविष्य आपोआपच त्या नुसार ठरत असतं.निवड सार्थ असेल तर जीवन सावरत आणि निवड चुकली तर व्यवस्थित असलेले जीवन देखिल बिघडत. सावरणं आणि बिघडण हे आपल्या निवडीशी संबंधित असतं. म्हणून जीवनात कोणत्याही विषयाची बाबीची अनुषंगिक निवड करायची आहे त्याचा मुख्य आधार ज्ञान असलं पाहिजे.शक्यतो ज्ञानावर झालेली निवड व्यर्थ ठरतं नाही.निवड म्हणजे वेचणे अथवा निवडणे असा जरी याचा सहज सुलभ अर्थ असला तरी देखील याचा आपल्या जीवनात खुप मोठा प्रभाव असतो.सर्वसाधारण पणे पसंत अथवा मनात लालसा,ललच निर्माण करणारी बाब अथवा मनाला भुरळ घालू शकेल अशी कोणतीही बाब त्या व्यतिरिक्त जीवन मार्गावर आवड आली म्हणजे निवड आलीच पण आवड म्हणून निवड केली तर प्रायश्चित्त निश्चित असतं. जीवन म्हटलं कि मनाला भुरळ पाडतील अशा अनेक बाबी असतात त्या अनुषंगाने कळत न कळत मन त्या दिशेने प्रवास करते आणि त्याच वेळी मनाला भुरळ पडण स्वभाविक आहे. आवड पसंत हि नैसर्गिक आहे. या आवडीला जोड कशाची आहे त्यानुसार त्याच मुल्य ठरत असत.ज्ञान आणि संस्कार याच बरोबर नैसर्गिक न्याय संगत निवड जीवन उत्कर्ष घडवते. तर अनैसर्गिक असंस्कारीत अज्ञान अवस्थेतील निवड हि जीवन उध्वस्त करते.आपल संबंध जीवन हे आपल्या आवडी प्रमाणे त्याच दिशेने मार्गक्रमण करत असत.जीवनाची दिशा बदलणारी आवड हि उत्कर्ष घडवेल अशीच कहिशी असली पाहिजे. आवड आणि पर्यायाने निवड या जीवनातील अविभाज्य बाबी असुन आपण कोणत्या वेळी कोणत्या वयात कशाची आवडीच्या अनुषंगाने निवड करतोय




त्यानुसार आपल्या जीवनातील चांगले वाईट परिणाम अनुभवायला येत असतात.आवड निवड टाळता येणं जवळपास शक्य नसतं पण आपली निवड हिच आपलं जीवन घडवते किंवा बिघडवते त्यामुळे निवड गरजेची आहेच पण निवड हि जीवन घडवणारी असली पाहिजे. निवडीचा पाया जेव्हा ज्ञानावर आधारित असतो तेव्हा कल्याण उत्कर्ष होतो आणि निवडीचा पाया जेव्हा अज्ञानावर आधारित असतो तेव्हा मात्र आपलं अहित होत हे अगदी वास्तव आहे.जीवन वाटेवर निवड अनिवार्य असते.पण आपली निवड हि उत्कृष्ट ज्ञानावरील असेल तर निश्चितच आपल हित होईल या मध्ये शंका नाही पण जर हिच निवड अज्ञान अवस्थेतील असेल तर मग मात्र आपल्याला हिच निवड पश्चात्ताप करायला भाग पडणार या मध्ये दुमत नाही. आपण आपल्या जीवनातील वेगवेगळ्या टप्प्यांवर वेळ काळ प्रसंगानुरूप अनेक बाबींची निवड करत असतो पण हिच निवड आपलं भविष्यातील जीवनाची दिशा आणि दशा ठरवत असते म्हणून आपण कोणत्याही संदर्भात निवड करताना खूप विचारपूर्वक असलं पाहिजे कारण निवड हि जीवनाचा विनाश करणारी नाही तर जीवनाचा उत्कर्ष करणारी ठरली पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जयाद्रीच्या जिजामाता प्रांगणात जिल्हा बालवीर मार्गदर्शन मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** भारत स्काऊट गाईड्स कार्यालय आणि पुणे शिक्षणविभाग तसेच शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ पुरंदर च्या संयुक्त विधमाने स्काऊट गाईड जिल्हा मेळावा जेजुरीच्या जिजामाता इंग्लिश स्कुल च्या प्रांगणात संपन्न झाला 31 डिसेम्बर 2023आणि 1जानेवारी 2024 पूर्वसंध्या नूतनवर्षी दिनी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या शुभारंभाचे उदघाट्न निवृत्त कर्णल रामचंद्र काकडे, एस एसी बोर्ड सचिव माणिक बांगर यांचे हस्ते करण्यात आले यावेळी जेजुरी ग्रामीण रुग्णालया अधीक्षक प्रबंध भिसे मुख्यध्यपक संघ अध्यक्ष प्रा नंदकुमार सागर मुख्यध्यापिका सरिता कपूर, गायत्री बेलसरे तसेच मार्गदर्शक प्रशिक्षक उपस्तिथ होते. या मेळाव्यात जिल्ह्यातून सुमारे आठशे विदयार्थ्यांनी सहभाग दर्शवीला होता स्काऊट गाईड ही





जागतिक स्तरावरील शैक्षणिक चळवळ असून बाल मनावर संस्कार रुजविण्याचे काम हे दल करत असते दोनशे दहा देशात सुमारे चार कोटी विद्यार्थी या दलात कार्यरत असल्याची माहिती प्रशिक्षक मार्गदर्शक दिगम्बर कारंडे यांनी यावेळी दिली. या सांस्कृतिक विज्ञान शौर्य निसर्ग स्वलंबन सारख्या जीवन शास्त्राचे प्रशिक्षण दिले जाते या मेळाव्याची सर्व विद्यार्थी शोभा यात्रा जेजुरी नगरींतून ग्रामप्रदक्षणा द्वारे करण्यात आली यात निसर्गसंवर्धन इतिहास स्वच्छता पथनाट्य शौर्य खेळ माध्यमातून जनजागृती करीत जेजुरीगडकोट जयाद्री ट्रेकिंग करण्यात आले. तर कार्यक्रम समारोप प्रसंगी जिल्हा मुख्यालय आयुक्त शोभा खंदारे, चंद्रकांत खंदारे, वरिष्ठ व्यख्याते महेश शेंडकर गटशिक्षण अधिकारी निलेश गवळी केंद्रप्रमुख अनिल जगदाळे डायट प्रमुख मधुकर क्षीरसागर, जेजुरी नगरसेवक सचिन सोनवणे, उद्योजक रवी जोशी, भगवान डिखळे, अजिंक्य देशमुख आदी मान्यवर उपस्तिथ होते. यावेळी विविध विषयावर मान्यवरानी मार्गदर्शन केले.

# ताजनापूर रस्ता व पूल कामाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** बाजार सावंगी महसूल मंडळ मधे शेखपूर व ताजनापूर येथील रस्ता काम व पुल कामाला सुरुवात करण्यात आली आहे. नोव्हेंबर -२०२३ महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या आवकाळी पावसामुळे सर्व कामांत व्यत्यय आले व त्यामुळे सर्वच कामे बंद होती.सद्या शेखपूर फाट्यावर तथा सावंगी -जैतखेडा रस्त्यांवरील पुल काम रेंगाळले आहे. तर सावंगी ते शेखपूर रस्त्यावर खडी उकरुण सवानकरण दबाई काम सुरू आहे तर सावंगी -ताजनापूर शिरोडी रस्ता खडी साहित्य टाकणे सुरु आहे.सावंगी ताजनापूर रस्ता धाड नदीवरील पूल काम सुरू करण्यात आले आहे.ताजनापूर शिरोडी चौफुली येथील नाल्यावरील पुल कामालाही सुरुवात करण्यात आली आहे.पुर्वीच सुरु असलेले कामे नोव्हेंबर महिन्यात झालेल्या आवकाळी पावसामुळे सर्व कामे ठप्प झाली होती. ती पुन्हा नव्याने कामे सुरु करण्यात आली आहे.सार्वजनिक बांधकाम विभाग खुलताबाद अंतर्गत ही कामे सुरु असून उपाभियंता कोलते शाखाभियंता सावजी यांच्याकडे ही कामे आहेत. येसगाव नं तीन ते किनगाव फाटा रस्ता डांबरीकरण करण्याची मागणी. येसगाव नं तीन ते किनगाव फाटा या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून गत वर्षी या रस्त्यावर खड्डे बुजवणे काम करण्यात आले.खडडे बुजवतान विभागाने यावर सरसकटपणे एक लेअर डांबरीकरण मजबुतीकरण करण्याचे आश्वासन दिले मात्र अवकाळी पावसा मुळे शक्य झाले नव्हते आता त्यावर डांबरीकरण मजबुतीकरण काम खडी डांबर टाकुन बाकी नव्याने करण्यात यावे, अशी मागणी प्रवासी नागरिक वाहनधारक नागरिकांनी केले आहे.




# भेंडीच्या चिंतामणी शैक्षणिक संकुलात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** तालुक्यातील श्री चिंतामणी शैक्षणिक संस्था भेंडी संचलित किड्स लर्निंग स्कूल , श्री टी.एन.रौदळ जुनियर कॉलेज, सिद्धिविनायक सेमी स्कूल येथे दिनांक 3 जानेवारी २०२४ रोजी मोठ्या उत्साहात शिक्षणाची देवता सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. चिमुकल्या मुलींनी सावित्रीबाई फुले यांना वंदन करून त्यांच्या वेशभूषेत येत कार्यक्रमास सुरुवात केली.

अशिक्षित समाजासाठी केलेले शैक्षणिक कार्य, कर्तुत्व याबाबत विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केलेले प्रसंग खरोखरंच शिक्षणाची देवता असलेल्या सावित्रीबाईचे कार्य नक्कीच भुषणावह आहे. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले व ज्योतिबा फुले यांच्यावर झालेले प्रसंग नाटक रुपात दाखवत त्यांच्या कार्याचा गौरव केला. त्या काळात स्त्री शिक्षणासाठी येणाऱ्या अडचणी शिक्षणापासून वंचित असलेल्या मुली, स्त्रिया यांना शिक्षण घेण्यास प्रवृत्त करून फक्त घरातील चूल आणि मूल करणाऱ्या स्त्रियांच्या आयुष्यात शिक्षण रुपी सूर्यकिरण भरले अशा या महान स्त्री शिक्षणाच्या योध्दा सावित्रीबाई फुले यांना त्रिवार वंदन करीत विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट विद्यार्थ्यांसमोर सादर केला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख ज्योती बांगर, संगिता नावरकर यांनी सहभाग घेतला.

या प्रसंगी स्कुलच्या मुख्याध्यापिका सुचिता रौंदळ, विभाग प्रमुख मनिषा वाघ, कांचन पगार, रिना पाटील, दर्शना पाटील, कविता पवार, श्वेता शिंदे, सुरेखा ठाकरे, धनश्री वाणी, तेजस्विनी पगार, कविता आहेर , विद्या पाटील, रोहिणी हिरे, सुवर्णा काकुस्ते, भावना पाटील, भाग्यश्री येशी , रुपाली जाधव, कांचन देवघरे, वैशाली चाटे, जयश्री आहेर, वैशाली मोरे, माधुरी रौंदळ, सोनाली पाटील, प्राचार्य मंगेश पगार,प्रा. सचिन पवार, प्रा.गायत्री सूर्यवंशी, प्रा.आकाश गांगुर्डे, प्रा. मोनाली ठाकरे, प्रा. निखिल रौंदळ, कविता आहेर, पाटोळे मावशी व देवघरे मावशी, सुनिता मावशी इत्यादी शिक्षक सहभागी होते.

कार्यक्रमाचे यशस्वीपणे सुत्रसंचलन संगिता नावरकर व ज्योती बांगर यांनी आभार यांनी मानले.

# सावित्रीबाई फुले यांच्या कार्यकर्तृत्वाने स्त्रियांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य : शारुबी सय्यद

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** १ जानेवारी १८४८ रोजी फुले दांपत्याने स्थापन केलेल्या भिडे वाड्यातील पहिल्या मुलींच्या शाळेने भारतातील समग्र महिलांना समानतेबरोबरच अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य बहाल केले. असे प्रतिपादन संत रामदास महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९३ व्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान प्रसंगी राष्ट्रीय युवा संगठनच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या सदस्या शारुबी सय्यद यांनी प्रमुख व्याख्यात्या म्हणून केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. प्रमोदकुमार जायभाये होते. तर प्रबोधन मंचावर महाराष्ट्रातील ख्यातनाम ग्रामीण कथाकार प्रा. अर्जुन डोईफोडे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. एम. ए. गवळी, प्रा. सुधाकर झुंजुरे तसेच मुख्य संयोजक तथा विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर (डॉ.) गजानन अवचार यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना शारूबी सय्यद म्हणाल्या की, आपल्या महाविद्यालयातील प्रत्येक मुलीने आपल्या आई-वडिलांकडे कॉलेजला जाण्याचा, शिक्षण घेण्याचा हट्ट धरला पाहिजे. कारण शिक्षणातूनच आपला भविष्यकाळ उज्वल आहे. प्रास्ताविकातून विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर (डॉ.) गजानन अवचार यांनी कार्यक्रम आयोजना मागील भूमिका विशद करून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांनी त्यांचे विचार आत्मसात करून आपला विकास साधावा असे आवाहन केले. प्रा. अर्जुन डोईफोडे यांनी हे जग काही बोटावर मोजण्या इतक्या व्यक्ती स्वातंत्र्यवादी विचार मांडणाऱ्या ते अंमलात आणण्यासाठी आपल्या प्राणाची बाजी लावणाऱ्या महामानवामुळे तरलेले आहे. असे बोधकथेद्वारे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपातून उपप्राचार्य प्रमोदकुमार जायभाये यांनी दैववादी अज्ञान-अंधश्रद्धा पसरविणारा एक विचार आहे तर दुसरा विवेकवादी विचार आहे. सांस्कृतिक स्तोम माजवून अंधश्रद्धा पसरविण्याचा पद्धतशीर कार्यक्रम चालू आहे, अशा भूलथापांना बळी न पडता आपण विवेकवादी, परिवर्तनवादी विचार स्वीकारावेत असे अवाहन विद्यार्थ्यांना केले.

# सुषमा अंधारे यांच्याविरुद्ध मालेगावात गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**मालेगाव :** हिंदू धर्मियांच्या भावना दुखावल्या प्रकरणी शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्याविरुद्ध येथील तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मालेगावातील अमन परदेशी यांनी या संदर्भात तक्रार दिली. एका वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत अंधारे यांनी हिंदू धर्मियांच्या देवतांबद्दल अनुचित शब्दप्रयोग केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला. यापूर्वी शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांच्याविरुद्ध पालकमंत्री दादा भुसे यांच्या तक्रारीनुसार मालेगाव न्यायालयात बदनामी प्रकरणी खटला दाखल आहे. आता अंधारे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या प्रकरणातील तक्रारदार परदेशी हा मालेगाव येथील युवक असून तो पुण्यात उच्च शिक्षण घेतो. डिसेंबरच्या अखेरीस तो मालेगाव तालुक्यातील चिखळओहोळ येथील मित्र किरण हिरे याच्याकडे आपल्या मित्रांसमवेत गेला होता. त्या ठिकाणी त्याला भ्रमणध्वनीवर एका युट्युब वाहिनीवर सुषमा अंधारे यांचे भाषण ऐकण्यास व बघण्यास मिळाले.






राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

# आव्हाडांनी प्रभु रामचंद्रालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले

आधुनिक केसरी

**शरदचंद्र पवारांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी पक्षाचे तुकडे पडल्यानंतर शिल्लक पवारांची राष्ट्रवादी वाचवण्यासाठी त्यांचे अनुयायी नसती उठाठेव करत राजकिय जमवाजमव करताना दिसतात. तीर्थक्षेत्र शिर्डी येथे पक्षाचे शिबीर चालु असताना आ.जितेंद्र आवाड यांनी मार्गदर्शनपर भाषणात अध्यात्मिक ज्ञानाचे डोस कार्यकर्त्यांना पाजताना समस्त हिंदु अस्मितेवरच घाला घातला. वारकरी संप्रदायासह राम भक्तांना दुःखी करताना त्यांनी प्रभु रामचंद्र मटन खात होते? एवढेच नाही तर राम शिकारी होता असं म्हणत आपल्या निकृष्ट बुद्धीचे दिवाळे काढले.**

पक्ष वाचवण्यासाठी चक्क प्रभु रामाला आवाडांनी पिंजऱ्यात उभा केले. ज्यांनी कधी रामायण ऐकलं नाही, ज्यांना वाल्मिकीरचित रामायणाचं पान माहित नाही? अशांनी केवळ वर्तमान राजकिय ढसळमिसळीत मताचं लांगुनचालन करण्यासाठी हिंदु अस्मिताच उधळुन टाकणं हा खऱ्या अर्थाने मुर्खपणाच म्हणावा लागेल. चौदा वर्षाच्या वनवासात प्रभु रामचंद्रांनी केवळ कंदमुळे खाल्ली आणि राम शिकारी नव्हता, हरिणाची शिकार केली, तो हरिण मारिच राक्षस होता हे आता आवाडांनी



वाचायला हवं.

लोकसभा निवडणुका तोंडावर असताना राज्यात राष्ट्रवादी पक्षात पडलेली उभी फुट शिल्लक राष्ट्रवादीला रसातळाला घेवुन गेल्याशिवाय रहाणार नाही. कारण अजितदादांच्या रूपाने सारेच बाहेर पडले. त्यामुळे आपलं भविष्य काय? या प्रश्नाभोवती फिरत असलेल्या जितेंद्र आवाडांनी जणुकाही आपल्यावर शिल्लक राष्ट्रवादी वाचवण्याची जबाबदारी या आविर्भावात शिर्डीच्या शिबीरात भाषण करून टाकलं. अजितदादा बाहेर पडल्यानंतर ग्रामपंचायतीच्या निवडणुका पार पडल्या.ज्यात दादाच्या नेतृत्वाने बाजी मारली. विशेषतः नविन पिढीत दादाचं नेतृत्व वरचढ असल्याचंही वर्तमान राजकिय परिस्थितीत दिसुन येतं. शरद पवारांच्या गटात असलेली राजकिय अस्वस्थता कमालीची असुन शिर्डीच्या शिबीरात रोहित पवार यांचं नसणं खऱ्या अर्थाने त्यांचे प्रदेश अध्यक्ष जयंतराव पाटलांच्या भोवती संशयाचं वारंच फिरतेय की काय? या मंडळीला आता उबाठा नेत्याशिवाय पर्याय राहिला नाही. कारण राष्ट्रीय काँग्रेस नेतृत्वाचा मुळात शरदचंद्र पवार यांच्यावरही विश्वास नाही. त्यामुळे सद्या तरी पवारांच्या राष्ट्रवादीसाठी उबाठा नेते उद्धव ठाकरे हेच तारणहार म्हणावे लागतील. कदाचित शिल्लक राष्ट्रवादी उबाठा गटात विलीन होईल याची शक्यता नाकारता येत नाही. राष्ट्रवादीचा इतिहास पाहिला तर मताच्या लाचारीसाठी ही मंडळी काही पण करते. ज्याच्यासाठी जितेंद्र आवाड यांच्यासारख्या तोंडाळाचा वापर अधुनमधुन केला जातो. याच आवाडांनी मध्यंतरी औरंगजेब-अफझलखानाचे समर्थन केले होते. काल तर त्यांनी सडलेला मेंदू आपला कुठे आणि कसा बरबळतो? याचे दर्शन देशवासियांना दाखविलं. चिंतन शिबीरात मार्गदर्शन करताना धर्मनिरपेक्ष पुरोगाम्याचा डांगोरा त्यांनी पेटविला. महात्मा गांधी यांना देखील जातीपातीच्या रांगेत उभा केले. निवडणुका तोंडावर आल्या अशा परिस्थितीत केवळ मताचं लांगुनचालन करण्यासाठी आवाडांनी थेट प्रभु रामचंद्राला आरोपीच्या पिंजऱ्यात उभा केले. वास्तविक पहाता हा विषय भाषणात काढण्याची त्यांना गरज नव्हती. देशात 22 जानेवारी रामलल्ला मुर्ती प्रतिष्ठापना होत असताना ज्याचा उत्सव सद्या गल्ली ते दिल्ली जोरात सुरू आहे. रामलल्ला प्रतिष्ठापनेच्या दिवशी अक्षदा वाटप आयोध्येहुन आलेल्या प्रक्रियेचे सुरू आहे. त्यातच नेहमीप्रमाणे हिंदु द्वेषाची गरळ आवाडांनी ओकुन टाकली. प्रभु रामचंद्र मटन खात होते? राम शिकारी होता? एवढेच नाही तर चौदा वर्षे वनवासात त्यांनी मांसाहारी आहार केल्याचा आरोप जाहिरपणे आवाडांनी केला. खरं तर सडलेला मेंदु असल्यानंतर कुणी कितीही मोठा असो? किंवा तत्वज्ञानी असो? त्याच्या बुद्धीचे दिवाळे निघाल्याशिवाय रहात नाहीत. साहजिकच आहे की आवाडांच्या वक्तव्यानंतर हिंदु अस्मिता, रामभक्ताचा एवढेच नव्हे तर वारकरी संप्रदायातील प्रत्येक जीवाचा अपमान झाला. अतिशयोक्ती नाही तर रात्री अनेकांना जेवण देखील गोड लागले नाही. पण एक लक्षात घ्या, वनवास भोगुन परत आल्यानंतर आयोध्येत देखील एका द्वेष्टाने सीतामाईवर आक्षेप घेतला, जिला अग्निदिव्य परीक्षा द्यावा लागली. तसाच मुर्खपणा आवाडांनी केला. पण आता राम मटनाची अग्निपरीक्षा देणार नाही हे खरे. मात्र याचे परिणाम आवाडांच्या महायुतीला निश्चित भोगावे लागणार. या टोणग्याने मुळात वाल्मिकी रामायण वाचलं का? हा प्रश्न पडतो. आजवर कुठल्याही कथेत किंवा रामायणात प्रभु रामचंद्र शिकारी होते असा उल्लेख आढळुन आला नाही. अगदी रामायणाचार्य रामराव ढोक महाराज यांनी देखील राम शिकारी होता असे कधी म्हटलं नाही. हरिणाची शिकार केली तो मुळात हरिण प्राणी नव्हता तर मारिच नावाचा मायावी राक्षस होता. त्याला शिकार म्हणता येईल का? दुसरं असं प्रभु रामचंद्र जेव्हा वनवासात निघाले पहिला मुक्काम गंगेच्या तीरावर प्रयागराज येथे झाला ज्या गावाचे नाव श्रृंगपुरी असं म्हणता येईल. एक नावाडी भेटला ज्याचे नाव केवठ होतं. ज्याने पैलतीरीसे राम को नदी पार कर दिया. अधिक मिळालेली माहिती अशी की, भिल्ल समाजाचा राजा गोहक त्या प्रदेशाचा मालक होता. भिल्ल म्हटलं की शिकार आणि मांसाहार आलाच. जगाचा बाप आपल्या प्रदेशात मुक्कामी आहे त्याला पाहुणचार नाही केला तर भिल्ल समाजाविषयी चांगला संदेश जाणार नाही. असं समजुन त्या गोहक नावाच्या राजाने वनवासी रामाला खाण्यासाठी मटण, मासे आणि कंदमुळे समोर ठेवली. त्यावेळी रामाने स्मित हास्य करून कंदमुळे सेवन केल्याचा उल्लेख विविध कथा, पुराण आणि रामायणात आढळुन येतो. ज्याला संस्कृतमध्ये भगवान फळमुच खायी असा उल्लेख येतो. त्याहुन भरत जेव्हा सोडायला आला त्यावेळी देखील तिथे भरताने कंदमुळेच रामासोबत खाल्ली. एवढेच नाही तर तब्बल चौदा वर्षे राम, लक्ष्मण आणि सीता यांनी केवळ फळं खावुन वनवास भोगला. राक्षस कुळाचा नाश शाकाहारी राहुनच प्रभु रामचंद्रांनी केला. राम सेवक हनुमानाने देखील फळाचे सेवन करतच सेवा केली. चौदा वर्षाच्या वनवासात प्रभु रामाने पायाखाली मुंगी देखील मारली नाही. मग तो शिकारी कसा म्हणता येईल? पण आवाडांसारखे ज्यांचा जन्म कदाचित राक्षस कुळातला असु शकतो. अधुनमधुन अशा प्रकारची गरळ ओकुन जातीपातीत द्वेष निर्माण करतात. खरं तर जितेंद्र आवाडांच्या बोलण्याला समर्थन आहे का नाही? असा खुलासा दस्तुरखुद्द शरद पवारांनी करायला हवा. कदाचित पवार समर्थन देवु शकतात. कारण ते स्वतःच नास्तिक आणि देवाधिकाला कधीच मानत नाहीत. मतांवर डोळा ठेवायचा आणि राजकारण करायचे ही शिकवण वर्षानुवर्षे आपल्या पिलावळाला पवारांनी दिलेली आहेच. या उपर सांगायचं झालं तर ज्या पद्धतीने आज त्यांच्या पक्षाची वाताहत होताना दिसते हे केवळ आपल्या कर्माचे पाप असं म्हणायला हरकत नाही. जैसी करणी, वैशी भरणी हेच म्हणावे लागेल. आमचं हिंदुत्व बेगडी नव्हे, शेंडी-जाणव्याचे नव्हे, असं छातीठोक सांगणाऱ्या उद्धव ठाकरेंनाही आमचा सवाल? जितेंद्र आवाड हे महाशय महायुतीचा घटक आहे, प्रभु रामचंद्राविषयी त्यांनी ओकलेली गरळ तुम्हाला मान्य आहे का?याचं उत्तर मिळायलाच हवं. सद्या तरी राज्यात नव्हे तर देशातील समस्त हिंदु बांधव रामभक्त आवाडांच्या आरोपानंतर प्रचंड दुःखी हे नक्कीच म्हणावे लागेल.

# शास्त्रज्ञांनी दिली नववर्षाची भेट

आधुनिक केसरी

देश स्वातंत्र्य होऊन ७५ वर्ष पूर्ण झाली. या ७५ वर्षात देशाने विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात खूप मोठी भरारी मारली आहे. विशेषः अंतराळ क्षेत्रात भारताने जी भरारी मारली आहे तिचे जितके कौतुक करावे ततिके कमी आहे. अंतराळ क्षेत्रात भारताने केलेल्या दैदिप्यमान कामगिरीत २०२३ हे वर्ष सुवर्ण अक्षराने नोंदवले गेले कारण या वर्षात भारताने चंद्रावर स्वारी करून प्रगत राष्ट्रात स्थान मिळवले. भारताने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यान उतरवून इतिहास घडवला अशी कामगिरी करणारा भारत जगातील पहिला देश ठरला. चांद्रयान मोहीम यशस्वी झाल्यानंतर भारताने आदित्य एल १ मोहीम हाती घेऊन थेट सूर्यावर स्वारी केली. भारताची मंगळ मोहीम ही चालू आहे. मागील वर्षातील या यशस्वी गगन भरारीचा आनंद कायम असतानाच नववर्षाच्या पहिल्याच दिवशी देशाला गौरवणीत करणारी आणि १४० कोटी जनतेला अभिमान वाटावी अशी बातमी आली. २०२४ सालच्या पहिल्याच दिवशी एक्सपोसाट उपग्रह कृष्ण विवरांचा अभ्यास करण्यासाठी अंतराळात सोडण्यात सोडण्यात आला. भारताची अंतराळ संशोधन संस्था इस्रोने वर्षाच्या पहिल्याच दिवशी या उपग्रहाचे यशस्वी प्रेक्षपण करून देशवासीयांना नवीन वर्षाची भेट दिली. सुमारे ४८० किलो ग्रॅम वजनाच्या पी एस एल व्ही रॉकेट वरून पाठवण्यात आलेला एक्स्पोसाट १४४ किलो वजनाचा आहे. पृथ्वीपासून ६५० किलोमीटर वरून अंतराळात पृथ्वी कक्षेशी सहा अंशाचा हा उपग्रह दर ९० मिनिटात पृथ्वीभोवती एक प्रदिक्षणा पूर्ण करणार आहे. २०१७ सालीच या उपग्रहाचे काम सुरू झाले होते. सुमारे साडे नऊ कोटी रुपये खर्चून २०१८ साली उपग्रह प्रेक्षपणासाठी तयार झाला होता मात्र काही तांत्रिक अडचणी आणि कोव्हिड यामुळे याचे प्रेक्षपण लांबले होते मात्र आता १ जानेवारीला त्याचे अखेर यशस्वी प्रेक्षपण करण्यात आले. हा उपग्रह अंतराळ संशोधनात महत्वाची भूमिका बजावणार आहे. हा उपग्रह कृष्णवीवरांचा अभ्यास तर करणारच आहे त्यासोबतच हा उपग्रह पृथ्वीकडे येणाऱ्या अंतराळी क्ष किरणांचे विभाजन पृथ्वीच्या दोन्ही ध्रुवावर कसे होते आणि त्यांची क्षमता काय असते याचाही अभ्यास करणार आहे. या उपग्रहाचे यशस्वी प्रेक्षपण करून इस्रोने देशाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. या यशासाठी इस्रोच्या शास्त्रज्ञांचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे. एक्स्पोसाट उपग्रहाचे यशस्वी प्रेक्षपण करून देशाची मान उंचावणाऱ्या इस्रोच्या सर्व शास्त्रज्ञांचे मनापासून अभिनंदन!



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५



# या खेळांबाबत दुजाभाव का ?

आधुनिक केसरी



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

**एकीकडे सरकार खेळाला महत्व देत असतानाच दुसरीकडे काही खेळ शिव छत्रपती पुरस्कारतून वगळून शालेय व व्यक्ती जीवनातील खेळाच्या महत्वाला दुय्यम दर्जा दिला. सरकारच्या या निर्णयाने क्रीडा क्षेत्रात नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे. सरकारनं खेलांनाबाबत दूजाभाव केला आहे.**

खेळ ही चांगली शारीरिक क्रिया आहे जी तणाव आणि चिंतामुक्त करते. खेळाडूंसाठी चांगले भविष्य आणि व्यावसायिक जीवन देते. खेळ खेळाडूंना नाव, प्रसिद्धी आणि पैसे देण्याची क्षमता ठेवतो. म्हणून असे म्हणता येते की वैयक्तिक फायद्यासह व्यावसायिक फायद्यासाठी खेळ खेळले जातात.या दोन्ही मार्गांनी आपल्या मेंदूला शरीराला आणि आत्म्याला फायदा होतो. खेळ हे आपल्यासाठी खूप फायदेशीर आहे कारण हे वेळेचे बंधन, धैर्य,शिस्त,गटामध्ये काम करणे हे शिकवतात. खेळ आत्मविश्वासाची पातळी वाढविण्यास आणि त्यामध्ये सुधारणा करण्यात मदत करते. खेळाचा नियमानं सराव केल्यावर आपण अधिक सक्रिय आणि निरोगी राहू शकतो.

खेळ खेळल्यामुळे अनेक आजारांपासून सुरक्षित राहण्यात मदत मिळते. जसे की संधिवात, लठ्ठपणा, हृदयविकार, मधुमेह इत्यादी. हे जीवनात धैर्य शिस्तबद्धता, वेळेचे पालन करणे आणि सभ्य बनवते.

आपल्यातील कमकुवत पणा कमी करून पुढे वाढणे शिकवते. हे शारीरिक आणि मानसिक दृष्टया आराम देतो. शूर बनवतो. राग आणि चिडचिड दूर करून सर्व समस्यांशी लढण्यासाठी सज्ज करतो. खेळ खेळणे एका व्यक्तीसाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहे. हे शारीरिक बळ देण्यासह मानसिक सामर्थ्य देते. मैदानी खेळ जसे की फुटबॉल, हॉकी, व्हॉलीबॉल, बेसबॉल, क्रिकेट, टेनिस, खोखो, कब्बडी हे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारण्याचे काम करतात. तसेच घराच्या आत खेळले जाणारे खेळ जसे की बुद्धिबळ, सुडोकू हे मानसिक दृष्टया प्रबळ करतात आणि एकाग्रता वाढवतात. म्हणून खेळ आपल्यासाठी खूप महत्त्वाचे आहे.मात्र सरकारने कॅरम, शरीरसौष्ठव पॉवर लिफ्टींग ,घोडेस्वारी सारख्या खेळांना पुरस्कारातून वगळले. आताही क्रीडा पुरस्काराच्या नव्या नियमावरुन क्रीडा वर्तुळात संतापाची लाट उसळलीय. कॅरम, शरीरसौष्ठव, पॉवरलिफ्टिंग, बिलियर्ड्स-स्नूकर, अश्वारोहण, गोल्फ आणि यॉटिंग या खेळांना पुरस्कारांमधून वगळण्यात आलंय. पॉवरलिफ्टिंग, शरीरसौष्ठव, कॅरम, बिलियर्ड्स-स्नूकर हे चार खेळ ऑलिम्पिकमध्ये नाही. तसंच कुठल्याही मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत यांचा समावेश नसल्याचे कारण देण्यात आलंय. तर अश्वारोहण, गोल्फ, यॉटिंग हे खेळ ऑलिम्पिकमध्ये आहेत. मात्र राज्यात या खेळांचा प्रसार नसल्याचं कारण पुढे करण्यात आलंय. दुसरीकडे आट्यापाट्या या खेळाला मात्र पुरस्कारात कायम ठेवलंय. आट्यापाट्याला ऑलिम्पिक संघटनेची मान्यता नाही.. तसंच आट्यापाट्या खेळाच्या राष्ट्रीय स्पर्धांची माहितीही कधी समोर येत नाही. तरीही दरवर्षी या खेळात पुरस्कार मिळतो, यावरुनही क्रीडा क्षेत्रात संताप आहे. श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारासाठी नवी नियमावली तयार करण्यात आलीये. त्यात आता सहा क्रीडाप्रकारांना वगळण्यात आलं आहे. यामध्ये कॅरम, पॉवरलिफ्टिंग, शरीरसौष्ठव (बॉडीबिल्डिंग), बिलियर्ड्स-स्नूकर, अश्वारोहण, गोल्फ आणि यॉटिंग या क्रीडाप्रकारांचा समावेश आहे. त्यामुळे आता वाद पेटण्याची शक्यता आहे. त्याचं कारण नेमकं काय आहे? पॉवरलिफ्टिंग, शरीरसौष्ठव, कॅरम, बिलियर्ड्स-स्नूकर या चार खेळांचा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत समावेश करण्यात आला नसल्याने असा निर्णय घेण्यात आलाय. त्यावर राज्य क्रीडा मंत्रालयाने स्पष्टकरण दिलंय. आट्यापाट्या खेळाच्या मान्यतेचा प्रश्न ऐरणीवर असूनही केवळ पारंपरिक क्रीडा प्रकार म्हणून या खेळाला सामावून घेण्यात आले आहे. मात्र, इतर खेळांना भारतीय ऑलिम्पिक संघटनेची (IOA) मान्यता नसल्याचेही समोर आलंय. राष्ट्रीय स्पर्धा व्हायलाच हव्यात अशी अट नाही. राष्ट्रीय स्तरावरीलही स्पर्धांचे गुण ग्राह्य धरलं जातील असा बचाव करण्यात आला आहे. दरम्यान, संघटनांशी कोणतीही चर्चा सरकारने केली नाही. क्रीडा खात्याने केलेला सरकारी मूर्खपणा असल्याचा संतापही संघटनेने व्यक्त केला आहे. क्रीडा खात्याचा हा निर्णय नसून खेळांवर आणि खेळाडूंवर केलेला अन्याय असल्याचं राज्य शरीरसौष्ठव संघटनेचे सरचिटणीस अजय खानविलकर यांनी म्हटलंय. तर अन्यायाविरुद्ध आम्ही जोरदार लढा देणार, असा इशारा देखील त्यांनी यावेळी केला. तर आणखी काही खेळांना चाळणी लावण्याचा विचार राज्य क्रीडा खाते करत असल्याचं क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे सहसंचालक सुधीर मोरे यांनी म्हटलं आहे.विशेष म्हणजे केंद्र सरकारकडून त्यांच्या अत्याधिक असलेल्या नोकऱ्या कॅरम पटुंना देत असतात. महाराष्ट्र सरकारकडून पाच टक्के आरक्षित नोकरी दिल्या जात नाहीत आता तर शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारापासून त्यांना दूर ठेवण्यात आले आहे.



# माध्यमांकडून फुले दांपत्यांच्या ह्या प्रतिमा कधी वापरात येतील ?



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068


आधुनिक केसरी

**माध्यमे हा समाज प्रबोधन घडवून आणणारा समाजातील महत्वपूर्ण घटक आहे. प्रबोधनाला दिशा देण्याचे काम माध्यमे करत असतात.आणि ते काम त्यांनी अविरतपणे केलेच पाहिजे.माध्यमे आहेत म्हणून तर प्रबोधनाची प्रक्रिया टिकून आहे. तसंही प्रबोधन घडवुन आणणं हे खरच सोपं नसतं. झोपलेल्याला जागं करता येतं. परंतु झोपेचे सोंग घेतलेल्याला जागं करणं खूपच अवघड असतं. अशीच काहीशी परिस्थिती हल्ली कोणत्याही प्रबोधनाची होत असते.पूर्वी आपल्या महापुरुषांना समाजात प्रबोधन घडवून आणण्यासाठी खूप मोठा संघर्ष करावा लागला.**

खूप मोठी आव्हाने त्या काळात होती.पहिला विरोध हा घरातूनच यायचा मग समाजाचा विरोध तर अधिकच तीव्र असायचा...परंतु आजच्या काळात प्रबोधन करणं सोपं झालेलं आहे.

प्रबोधनाची विविध साधने आपल्या अवती भवती आहेत.हातात आलेला मोबाईल अगदी जगात काय घडत आहे.याची पुर्णपणे माहिती देत आहे.

परंतु एवढं सर्व असून ही प्रबोधनाच्या बाबतीत एखादा विषय समोर आला तर त्याबाबत पटकन जागृत होण्याची मानसिकता लोकांमध्येच दिसून येत नाही.एखादी बाब स्वीकारण्यास खूप विलंब लावला जात असतो?आजची प्रबोधनाची अधिकत्तम साधने पाहता.प्रबोधन होण्यासाठी एवढा विलंब का होतो.त्याचे अनुकरण का होत नाही?तेच समजत नाही.महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा संदर्भात सुद्धा तेच घडत आहे.गेली कित्येक वर्षांपासून सोशल मीडियातून काही बांधवांकडून फुले दांपत्यांच्या छायाचित्रांबाबत प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला जात असतो. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करत असताना शासनाने प्रकाशित केलेल्या प्रतिमा,छायाचित्र वापरात आणाव्यात हे वारंवार सांगण्याचा प्रयत्न विविध सामाजिक संघटना किंवा फुले प्रेमीकडून केला जात असतो.या बाबतीत कोणतीही जनजागृती होताना दिसत नाही.हा संदेश अनेकांपर्यंत जाऊन पोहचलेला आहे.याबाबत सकारात्मक पणे कृती लोकांकडून केली जात नाही.त्या प्रतिमा कार्यक्रम प्रसंगी पाहायला मिळत नाहीत.शासनाने प्रतिमा तर प्रकाशित केल्या.त्यांनी त्यांची जबाबदारी पार पाडली.परंतु शासनाने प्रकाशित केलेल्या ह्याच प्रतिमा,छायाचित्र हे शासकिय व प्रशासकीय इमारतीतून सुद्धा पाहायला मिळत नाहीत.ही सुद्धा एक मोठी शोकांतिका आहे.एखाद्या ठिकाणी आढळुन येईल.जनजागृतीच्या हेतूने प्रतिमा कुणी तरी भेट स्वरुपात देण्याचा प्रयत्न ही केला असेल.परंतू दरवर्षी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांची जयंती किंवा स्मृतिदिन जवळ आला की,अभिवादन करण्यासाठी ह्या शासकीय प्रतिमा,छायाचित्र वापरावेत हे सुद्धा आवर्जुन सांगावे लागत आहे.आज ना उद्या हा बदल घडेल.त्यानुसार अनेक जण आपापल्या परिने सांगण्याचा प्रयत्न करत आहेत.प्रतिमा देण्याचा कसोशीने प्रयत्न करत आहेत. अनेकांकडून सोशल मीडियातून मोहीम राबविली जात असते. खरंतर ह्या प्रतिमा लोकांसमोर घेऊन जाण्याची अधिकत्तम जबाबदारी ही आजच्या माध्यमांची सुद्धा आहे.ह्या प्रतिमा माध्यमातून लोकांमध्ये सहज पणे घेऊन जाता येऊ शकतात. माध्यमातून नेहमी प्रबोधनाचे प्रतिबिंब उमटलेले पाहायला मिळते.कदाचित ह्याच प्रतिमा माध्यमांनी वापरात आणल्या तर नक्कीच लोकांच्या नजरेसमोर ह्या प्रतिमा येतील.शासकीय प्रतिमा लोकांच्या नजरेसमोर येत नाहीत.त्या लोकांमध्ये घेऊन जाण्याची महत्वपूर्ण कामगिरी ही माध्यमांनी पार पाडल्यास नक्कीच या बाबत प्रबोधन होईल. त्यामुळे या प्रतिमा बाबत प्रथम जागृती ही माध्यमात होणे गरजेचे आहे.कारण माध्यमाकडूनच ह्या प्रतिमा वापरात आणलेल्या दिसुन येत नाहीत.



महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर आधारित लेख व बातम्या प्रकाशित होत असतात.परंतु शासनाने प्रकाशित केलेल्या ह्या प्रतिमा त्या लेखांवर किंवा बातम्यांवर पाहायला मिळत नाहीत.त्यामुळेच ही छायाचित्र लोकांच्या नजरेसमोर वारंवार येताना दिसत नसल्याने ह्या छायाचित्रांचा वापर होत नाही.डिजीटल मीडिया,प्रिंट मीडिया,इलेक्ट्रॉनिक मीडिया असेल किंवा कोणतेही माध्यमे असतील या प्रत्येकाची जबाबदारी आहे की ह्या प्रतिमा वापरात आणल्या पाहिजेत.जयंतीचे औचित्य साधुन अभिवादन जाहिराती वर्तमान पत्रातून प्रकाशित होत असतात. त्यामध्ये फुले दांपत्यांचे छायाचित्रे सुद्धा असतात.अशा जाहिरातीतून जर शासकीय प्रतिमा वापरण्यास सुरुवात झाल्यास नक्कीच ही जाहिरातच लोकांच्या दृष्टीने प्रबोधनाची ठरू शकते.तसेच हे छायाचित्र जास्तीत जास्त लोकांपर्यंत जाऊन पोहचू शकते.परंतु ह्या छायाचित्रांचा, प्रतिमांचा विसरच माध्यमांना पडल्यानेच लोकांपर्यंत जागृती घडत नाही.

लोकांमध्ये प्रबोधन घडणे तर लांबचीच गोष्ट आहे. लोकांना सवय लावली तरच त्या सवयीचा परीणाम दिसून येतो.माध्यमांनी मनावर घेतले तर नक्कीच या संदर्भात बदल घडताना दिसून येईल. जे माध्यमातून येतं तेच लोकांच्या मनात जाऊन बसते.त्यामुळे माध्यमे हा प्रबोधनाच्या दृष्टीने खुप महत्वाचा घटक आहे.लोकं बदलतील तेव्हा बदलतील.परंतु माध्यमांनी या प्रतिमा बाबत सजग आणि जागृत राहणे गरजेचे आहे.जयंती कार्यक्रम असो किंवा स्मृतिदिन कार्यक्रम असो अशावेळी ज्या जाहिरात घेतल्या जात असतात,बातम्या प्रकाशित केल्या जात असतात.अशावेळी या शासकीय प्रतिमांचा वापर केल्यास नक्कीच शासनमान्य छायाचित्रे यांची जनजागृती होण्यास वेळ लागणार नाही.यातूनच आपोआप प्रबोधन होऊन जाईल.सोशल मीडियातून फुले दांपत्याना अभिवादन करण्यासाठी लोकं सुद्धा हेच छायाचित्र स्वतःहून वापरतील.हे छायाचित्रे वापरावीत असे म्हणण्याची वेळ सुद्धा येणार नाही.त्यामुळे माध्यमांनी छायाचित्रे कोणते वापरले पाहिजे.याची जागृती करणे महत्वाचे आहे.माध्यमातून जनतेच्या मनावर एक चांगला,सकारात्मक आणि प्रभावीपणे प्रबोधन होणे अपेक्षित आहे.जो फुले दांपत्याच्या बाबतीत काल्पनिक छायाचित्रांचा जास्तीत जास्त वापर होत आहे.त्याचे प्रमाण आपोआप कमी होण्यासाठी माध्यमांनीच प्रयत्न करायला हवेत. आजही शासनाने प्रकाशित केलेली छायाचित्रे समाजमना मध्ये दुर्लक्षित आहेत.काल्पनिक छायाचित्र आणि शासकीय छायाचित्र यातील फरक समजून घेणे गरजेचे आहे आणि हे सांगण्याची गरज निर्माण झालेली आहे. माध्यमानी यात पुढाकार घेणे आवश्यक असून फुले दांपत्याचे कार्य हे जनतेपर्यंत घेऊन जात असताना त्या कार्यासोबतच त्यांचे छायाचित्रे घेताना ही शासनमान्य छायाचित्रे घ्यावीत जेणे करून याचा जनजागृती होऊन ही छायाचित्रे लोकांच्यात घरा घरातच नव्हे मना मनात जातील.हा विश्वास माध्यमातील प्रबोधनावर वाटत आहे.त्यामुळे माध्यमांकडून फूले दांपत्यांच्या ह्या शासकीय प्रतिमाना प्रबोधना साठी पुढे आणल्यास नक्कीच माध्यमांकडून फूले दांपत्यांच्या ह्या प्रतिमा कधी वापरात येतील? असे म्हणावे लागणार नाही.

# पंखांना लिहिण्याचे बळ देणारी नामदेवाची लेकरं आम्ही



गुलाब बिसेन
संपर्क क्र. 9404235191

आधुनिक केसरी

**मराठी बालसिहित्यात उल्लेखनीय योगदान देणारे साहित्यिक बबन शिंदे यांचे "नामदेवाची लेकरं आम्ही" हा संपादित कविता संग्रह नुकताच प्रकाशित झालाय. नामदेवांची जन्मभूमी असलेला हिंगोली जिल्हा त्यांच्या साहित्य संस्काराने आणि आशिर्वादाने पावन झाला आहे.**

या जिल्ह्यातील अनेक साहित्यिक आपल्या साहित्याच्या माध्यमातून मराठी साहित्याची सेवा करत आहेत. याच हिंगोली जिल्ह्याला लाभलेली साहित्याची परंपरा अशीच पुढेही चालत राहावी. यासाठी नवोदित साहित्यिक घडावेत या उदात्त हेतूने साहित्यिक बबन शिंदे यांनी शालेय विद्यार्थ्यांना लिहितं करण्याचा अभिनव उपक्रम शाळांतून राबवला. या उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी छान छान कविता लिहिल्या. याच कवितांतील निवडक कवितांचा "नामदेवाची लेकरं आम्ही" हा कवितासंग्रह पुस्तक रूपाने प्रकाशित केला आहे. नव्या पिढिला लिहितं करणाऱ्या मोजक्या प्रयत्नांतील हा एक प्रयत्न यशस्वी झाल्याचे हा कविता संग्रह वाचल्यावर दिसून येते. या कविता संग्रहातून मुले नुसती व्यक्त झाली नाहीत तर आपल्या भवतालाकडे बघण्याचा दृष्टिकोण दाखवण्याचा प्रयत्न करताहेत. मुलांना व्यक्त होण्याची योग्य संधी मिळाल्यास काय होऊ शकते याचे हे एक उत्तम उदाहरण म्हणता येईल. या संपादिक कविता संग्रहाची सुरूवात "यशाची वाट" या कु. तन्वी कल्याणकर हिने लिहिलेल्या कवितेने केलेली आहे. विरोधाशिवाय माणसाचं यश कामाचं नाही असे ही कविता सांगते. "असा पाहिजे मानव" या कवितेत इयत्ता ८ वीत शिकणारा सुधीर लिहितो,

**रूपवान पाहिजे ना धनवान पाहिजे**
**माणूस भेटलेला गुणवान पाहिजे**

माणसाची सुंदर अशी व्याख्या या कवितेतून कवीने केली आहे. एकविसाव्या शतकातील सर्वात मोठी महामारी "कोरोना" या लेकरांनी याची देही याची डोळा प्रत्यक्ष अनुभवलेली असल्यामुळे त्याचेही प्रतिबिंब त्यांच्या कवितांत पडलेले दिसून येते. त्यावर आधारीत डॉक्टर, कोरोना, आला कोरोना आला अशा कविता लेकरांच्या हातून रेखाटल्या गेल्या आहेत. कोरोना महामारीचा बालमनावर खोलवर परीणाम झाला. त्याविषयी लिहिताना कु. आदिती देशमुख आपल्या "आला कोरोना आला" या कवितेत लिहिते,

**कुठले आईस्क्रीम कुठलं खेळणं कुठली**
**शाळा या कोरोनाच्या नावाने पोटात**
**येतो गोळा** याच महामारीत देवदूत ठरलेल्या डॉक्टरांविषयी कृतज्ञता व्यक्त करताना कु. संचिता जगताप लिहिते,

**कोरोनामुळे केली नाही पंढरीची वारी**
**डॉक्टर करतात दूर करतात कोरोनासारखी**
**महामारी डॉक्टर कर्मचाऱ्यांना करा मानाने**
**अभिवादन त्यांच्यामुळेच आपल्याला**
**मिळालय जीवदान**

बालपण हे विविधांगी अनुभवांची साठवण करण्याचा काळ. आयुष्याला पुरतील अशा अनुभवांची साठवण याच वयात होत असते. त्यामुळे सभोवतालच्या परीस्थितीचे प्रतिबिंब मुलांच्या कवितांतून उमटताना दिसून येते. या अनुभव विश्वातून शेतकरी राजा, राखी, झाड, येना सावित्री, मैत्रीचा प्रकार, दुःख माझं, निःशब्द, संविधानाचं पुस्तक, आम्ही युवा, माझी आठवण, काय काय करू मी पाठ अशा कविता बालमनात फुलल्या आहेत.

बालपण हे आईच्या पदराला धरून फुलत असते. आई हे बालकांची पहिली शाळा तसेच संस्काराचे आद्य विद्यापीठ असते. आई आणि बाळ यांच्यातील नाते प्रेमाच्या धाग्याने घट्ट विणलेले असते. अशा आईविषयी प्रत्येकालाच लिहावेसे वाटणे स्वाभाविक आहे. या कवितासंग्रहात अनेक बालकविंनी आईवर कविता लिहालेल्या आहेत. आई तुझ्यासारखे रूप, माझी आई, आई, आई असते आई, माझी माय, आई तू किती महान अशा कवितांतून बालकविंनी आपल्या आईविषयीच्या उत्कट भावना व्यक्त केल्या आहेत. आईविषयी लिहिताना कु. पूनम गुठे लिहिते,

**आई असे आमचा दिन**
**आई असे आमचा राम**
**आई असे आमचा मित्र**
**आई दिसे आम्हा सर्वत्र**

या कवितांमध्ये कवींनी जसे आईविषयी लिहिले आहे तसेच ते आपल्या बालपणाविषयीही लिहितात. बाप कवितेतून व्यक्त होताना आदर्श मस्के म्हणतो,

**तापल्या उन्हात बाप**
**चालवी नांगर**
**खाऊन चटणी आणि**
**भाकर**
**शेतातून आल्यावर**
**घ्यायचा तो कुशीत**
**तेव्हा वाटायचे हे विश्वच**
**आपल्या मुठीत**

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी कविता कु. तनुजा कल्याणकर हिने लिहिली आहे. त्यात ती म्हणते,

**नाही घाबरलीस त्या छळाला**
**वाट दाखवलीस ग मला**
**धरूनी तुझ्या सावित्री हाताला**
**मी शिकले लिहायला**
**येना सावित्री येना झालीस का**
**परकी**

या कविता संग्रहातील सर्व कविता लेकरांच्या मनाचा आरसा आहेत. तसेच ह्या कविता समवयस्कांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्याही आहेत. या कवितासंग्रहाद्वारे लेखक बबन शिंदे यांनी लिहित्या हातांना बळ देण्याचे मौलिक कार्य केले आहे. या कविता संग्रहाची साहित्यिक फ. मु. शिंदे यांनी पाठराखण केली असून साहित्यिक डॉ. सुरेश सावंत आणि साहित्यिक नामदेव माळी यांनी शब्दरूपी शुभेच्छा दिल्या आहेत. चित्रकार संतोष घोंगडे यांनी या कविता संग्रहासाठी आकर्षक असे मुखपृष्ठ केले आहे. इसाप प्रकाशनने पुस्तकाची दर्जेदार निर्मिती करत संपादकांच्या प्रयत्नांना बळ दिले आहे. हा कविता संग्रह वाचकांना नक्की आवडेल याची मला खात्री आहे. लेखक बबन शिंदे यांच्या या लेखनप्रपंचाला खूप खूप शुभेच्छा!





श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

## आंतरराष्ट्रीय व्यासपीठ गाजवून सोडणारी!

आधुनिक केसरी

**सिंधुताई सपकाळ या भारतीय सामाजिक कार्यकर्त्या होत्या. त्या विशेषतः भारतातील अनाथ मुलांचे संगोपन करण्याच्या कार्यासाठी ओळखल्या जातात. त्यांना नुकताच २०२१मध्ये सामाजिक कार्य श्रेणीत पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या वेळोंवेळी अनेक गौरवांच्या मानकरी ठरल्या. सिंधुताईंना सुमारे ७५० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत.**

त्यांतील पद्मश्री पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, पुण्याच्या अभियांत्रिकी कॉलेजचा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा अहिल्याबाई होळकर पुरस्कार, मूर्तिमंत आईसाठीचा राष्ट्रीय पुरस्कार, आयटी प्रॉफिट ऑर्गनायझेशनचा दत्तक माता पुरस्कार, सोलापूरचा डॉ.निर्मलकुमार फडकुले स्मृती पुरस्कार,राजाई पुरस्कार, शिवलीला महिला गौरव पुरस्कार, श्रीरामपूर अहमदगर जिल्हा येथील सुनीता कलानिकेतन न्यासातर्फे कै.सुनीता त्र्यंबक कुलकर्णी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा सामाजिक सहयोगी पुरस्कार, सीएनएन- आयबीएन आणि रिलायन्स फाउंडेशनने दिलेला रिअल हीरो पुरस्कार, दैनिक लोकसत्ताचा सह्याद्रीची हिरकणी पुरस्कार, प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती पुरस्कार, डॉ.राम मनोहर त्रिपाठी पुरस्कार, पुणे विद्यापीठाचा जीवन गौरव पुरस्कार आदींचा समावेश आहे.

सिंधुताईंचा जन्म आणि त्यांचे सुरवातीचे जीवन खडतर होते. त्यांचा जन्म दि.१४ नोव्हेंबर १९४७ रोजी वर्धा जिल्ह्यातील पिंप्री मेघे गावात आणि ब्रिटीश भारतातील बेरार येथील अभिमन्यू साठे या गुराख्याच्या घरी झाला. एक अवांच्छित मूल असल्याने त्यांचे नाव चिंधी- फाटलेल्या कापडाचा तुकडा ठेवले. पण हीच चिंधी अनेक फाटक्या ठिगळांना जोडते, याचा त्यावेळी कोणी विचारही केला नसेल. अत्यंत गरिबी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि लवकर लग्न यामुळे त्यांना चौथी इयत्ता उत्तीर्ण झाल्यानंतर शाळा सोडावी लागली. त्यांचे वयाच्या बाराव्या वर्षी श्रीहरी सपकाळ यांच्याशी लग्न झाले, जे त्यांच्यापेक्षा तब्बल  वीस वर्षांनी मोठे होते. लग्नानंतर त्या वर्ध्यातील सेलू येथील नवरगाव गावात गेल्या. घरी प्रचंड सासुरवास होता. कुटुंबात शैक्षणिक वातावरण नाही. जंगलात लाकूडफाटा, शेण गोळा करताना सापडलेले कागदाचे तुकडे माई घरी आणायच्या आणि उंदराच्या बिळांत लपवून ठेवायच्या. क्वचित घरी एकट्या असल्या तर त्या अभ्यास करण्याचा प्रयत्न करीत. अठराव्या वर्षापर्यंत माईंची तीन बाळंतपणे झाली. त्या चौथ्या वेळी गर्भवती असताना त्यांनी त्यांच्या आयुष्यातला पहिला संघर्ष केला. तेव्हा गुरे वळणे, हाच व्यवसाय असायचा. गुरेही शेकड्यांनी असायची. त्यांचे शेण काढता काढता बायकांचे कंबरडे मोडायचे. शेण काढून बाया अर्धमेल्या व्हायच्या. पण त्याबद्दल कोणतीही मजुरी मिळायची नाही. रस्त्यावर मुरूम फोडणाऱ्यांना मजुरी, पण शेण काढणाऱ्यांना नाही. या शेणाचा लिलाव फॉरेस्टवाले करायचे. इथे सिंधुताईंनी बंड पुकारले आणि लढा सुरू केला. त्यामुळे या लिलावात ज्यांना हप्ता मिळायचा त्यांच्या हप्त्यावर गदा आली. हा लढा जिंकल्या पण त्यांना या लढ्याची जबर किंमत चुकवावी लागली. ताईंच्या या धैर्याने गावातील जमीनदार, दमडाजी असतकर दुखावला गेला होता. जंगलखात्याकडून येणारी मिळकत बंद झाली. दमडाजीने सिंधुताईंच्या पोटातील मूल आपले असल्याचा प्रचार सुरू केला. नवऱ्याच्या मनात त्यांच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण झाला आणि पूर्ण दिवस भरलेल्या ताईंना त्याने बेदम मारून घराबाहेर काढले. गुरांच्या लाथा बसून मरतील म्हणून तशा अर्धमेल्या अवस्थेत त्यांना गोठ्यात आणून टाकले. त्या अवस्थेत त्यांना कन्या जन्माला आली. नवऱ्याने हाकलल्यानंतर गावकऱ्यांनीही हाकलले. हे लग्न फार काळ टिकले नाही आणि वयाच्या वीसव्या वर्षीच त्यांना त्यांच्या मुलीसोबत नवऱ्याने सोडून दिले.

माराने अर्धमेल्या झालेल्या सिंधुताई माहेरी आल्या, पण सख्ख्या आईनेही पाठ फिरवली. परभणी, नांदेड, मनमाड रेल्वे स्टेशनांवर त्या भीक मागत हिंडायच्या. चतकोर भाकर, उष्टावलेले एखादे फळ हाती लागेल, म्हणून रात्रभर रेल्वे रुळांच्या कडेने फिरायच्या. एकदा जळगाव जिल्ह्यातील पिंपराळा स्टेशनवर त्यांनी आत्महत्येचा प्रयत्नही केला. पण लहान मुलीचा जीव घेतला तर पाप लागेल म्हणून मागे फिरल्या. मग पुन्हा भीक मागत पोट भरणे सुरू झाले. त्या दिवसभर भीक मागायच्या आणि रात्री स्टेशनवरच झोपायच्या. परंतु तेथे त्यांनी कधी एकटे खाल्ले नाही. स्टेशनवरच्या सगळ्या भिकाऱ्यांना बोलावून त्या मिळालेल्या अन्नाचा काला करायच्या आणि मग सर्व भिकारी



एकत्र बसून जेवायचे. त्यांनी २१ वर्षांच्या ताईंना संरक्षण दिले. दोन दिवस काहीच भीक मिळाली नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांना तेथे कायम राहता येणार नाही. म्हणून शेवटी सिंधुताईंनी स्मशान गाठले. अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी सिंधुताई यांनी ममता बाल सदन संस्थेची स्थापना केली. सन १९९४ साली पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात कुंभारवळण या गावात ही संस्था सुरू झाली. आपली कन्या ममता हिला दगडूशेठ हलवाई संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासाठी सेवासदन येथे दाखल केले आणि त्यांनी इतर अनाथ आणि बेवारस मुलांना आधार दिला. तेथे लहान मुलांना सर्व शिक्षण दिले जाऊ लागले. त्यांच्या भोजन, कपडे अन्य सुविधा यांची उपलब्धता संस्थेकडून केली जात असे. शिक्षण पूर्ण झाल्यावर येथील मुले आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील यासाठीही त्यांना मार्गदर्शन दिले जाते. आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्यावर या युवक युवतींना योग्य जोडीदार शोधून देणे आणि त्यांच्या विवाहाचे आयोजन करणे हे कार्यही संस्थेकडूनच केले जाते. अशी सुमारे १०५० मुले या संस्थेत राहिलेली आहेत. त्यांनी अन्य समकक्ष संस्थाही स्थापन केलेल्या आहेत त्या अशा- बाल निकेतन हडपसर, पुणे. सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, चिखलदरा. अभिमान बाल भवन, वर्धा. गोपिका गाईरक्षण केंद्र, वर्धा. ममता बाल सदन, सासवड. सप्तसिंधु महिला आधार बालसंगोपन व शिक्षणसंस्था, पुणे. आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी आपल्या संस्थेच्या प्रचारासाठी आणि कार्यासाठी निधी संकलन करण्याच्या हेतूने प्रदेशदौरे केले आहेत. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्यांनी आपल्या बोलण्याने आणि काव्याने समाजाला प्रभावित केले आहे. परदेशी अनुदान मिळणे सोपे जावे या हेतूने त्यांनी मदर ग्लोबल फाउंडेशन संस्थेची स्थापना केली आहे. त्यांना महानुभाव पंथाचा अनुग्रह होता. महानुभाव पंथाच्या नियमाप्रमाणे त्यांना भुमीडाग देण्यात आला.

अशातच सिंधुताईंवर दि.२५ नोव्हेंबर २०२१ रोजी हॉस्पिटलमध्ये डायफ्रामॅटिक हर्नियाची शस्त्रक्रिया झाली. त्यांच्यावर शस्त्रक्रियोत्तर काळजी घेण्यात येत होती. पाच वर्षांहून अधिक काळ ग्रस्त असलेल्या डायफ्रामॅटिक हर्नियामुळे त्यांचे डाव्या बाजुचे फुफ्फूस व्यवस्थितरित्या कार्य करीत नव्हते. शस्त्रक्रियेनंतर त्यांची प्रकृती थोडी बरी झाली होती. तथापि, पाच दिवसांपूर्वी त्यांना फुफ्फुसाचा संसर्ग वाढल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडू लागली, त्यामुळे त्यांना व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आले होते. दरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि दि.०४ जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी ८ वाजून १० मिनीटांनी त्यांचे निधन झाले. पुणे येथील गॅलक्सी केर या दवाखान्यामध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

## राज कपूर अचानक मध्यरात्री गीतकार शैलेन्द्र यांच्या घरी गेले आणि...

आधुनिक केसरी

**हिंदी चित्रपटसृष्टीत असे अनेक गीतकार होऊन गेले  ज्यांनी आपल्या गीतांद्वारे केवळ आपले निर्माते आणि दिग्दर्शक यांचीच मने जिंकली असे नव्हे तर  सर्वसामान्य लोकांच्या हृदयातही मानाचे स्थान मिळविले. हल्लीच्या पद्धतीनुसार त्याकाळी चित्रपटात गीते `टाकली' जात नव्हती तर प्रसंगावर लिहिली जात होती. ती संगीतबद्ध होऊन त्यांच्या ध्वनिमुद्रिका बाजारात विक्रीसाठी आल्या की सगळीकडे त्या गीतांचा बोलबाला होत असे. असेच एक श्रेष्ठ गीतकार होते शंकरदास केसरीलाल शैलेन्द्र ! सारे जग त्यांना `शैलेन्द्र' या लोकप्रिय नावाने ओळखते.**

प्रख्यात अभिनेते-दिग्दर्शक राज कपूर हे शैलेन्द्र यांच्या अशाच एका गीताच्या प्रेमात इतके बुडाले की ते चक्क मध्यरात्री शैलेन्द्र यांच्या निवासस्थानी दाखल झाले. १९५९ सालच्या राज कपूर-नूतन अभिनीत आणि हृषिकेश मुखर्जीदिग्दर्शित `अनाडी' या चित्रपटातील "सब कुछ सीखा हमने न सीखी होशियारी" या गीताच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळची ही घटना आहे. हे गीत शैलेन्द्र यांनी लिहिले होते, शंकर-जयकिशन यांनी संगीतबद्ध केले होते आणि पार्श्वगायक मुकेश यांनी गायिले होते. ध्वनिमुद्रणाच्या स्टुडिओत वाद्यवादक, संगीत दिग्दर्शक, पार्श्वगायक तर उपस्थित होतेच; शिवाय खुद्द राज कपूरही हजर होते. उपस्थित नव्हते ते गीतकार शैलेन्द्र ! गीताच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी गीतकार बहुतांशी उपस्थित असतातच; पण त्या दिवशी का कोण जाणे शैलेन्द्र आलेले नव्हते. अखेर शैलेन्द्र यांच्या अनुपस्थितीतच गीताचे ध्वनिमुद्रण सुरू होऊन मुकेश यांच्या आवाजात गीत ध्वनिमुद्रित झाले. ध्वनिमुद्रण संपल्यावर राज कपूर शंकर-जयकिशन यांना म्हणाले, की मला




या गीताची नक्कल (कॉपी) करून द्या म्हणजे मी ते घरी जाऊन ऐकेन. जयकिशन यांनी गीताची नक्कल तयार करून ती राज कपूर यांना दिली. ती घेऊन ते स्टुडिओतून बाहेर पडले आणि सरळ आपल्या निवासस्थानी गेले.घरी आल्यावर भोजन करून शांतपणे एका खोलीत बसून राज कपूर यांनी हे गीत ऐकावयास सुरुवात केली. घड्याळाचे काटे पुढे सरकू लागले. एक तास झाला. दोन तास झाले. तीन तासही उलटले. रात्रीचा एक वाजला. राज कपूर हे गीत एकदा नव्हे, दोनदा नव्हे तर अनेकदा ऐकत बसले होते. या गीताने त्यांच्या मनाला असा स्पर्श केला होता की रात्रीचे दोन वाजले असतानाही त्यांनी त्याची पर्वा न करता सरळ आपली गाडी काढली आणि तीत बसून ते थेट शैलेन्द्र यांच्या निवासस्थानाकडे निघाले. शैलेन्द्र यांच्या `रिमझिम' या  बंगल्यासमोर गाडी थांबली. मध्यरात्रीची वेळ असल्याने बंगल्याच्या आत नीरव शांतता पसरली होती. सगळे दिवे मालवलेले होते. बंगल्यातील सगळे निद्राधीन झाले होते. बंगल्याची घंटा वाजवावी की वाजवायला नको असा विचार करत राज कपूर तिथे उभे राहिले. पण त्यांना राहवले नाही आणि त्यांनी दरवाजावरील घंटा वाजविलीच ! थोड्याच वेळात घरातील नोकराने दरवाजा उघडला आणि मध्यरात्री अशा प्रकारे राज कपूर आलेले पाहून तो पुरता गोंधळून गेला. इतकी रात्र झाली आहे, काही गडबड तर झालेली नाही ना असा विचार करत नोकराने राज कपूर यांना सोफ्यावर बसविले आणि तो शैलेन्द्र यांना उठविण्यासाठी त्यांच्या खोलीकडे धावला. राज कपूर मध्यरात्री आपल्या घरी आले आहेत हे शैलेन्द्र यांना समजताच त्यांच्याही मनात शंका-कुशंकांचे काहूर उठले. काही तरी अघटित घडले असावे अशी भीती मनात बाळगूनच शैलेन्द्र राज कपूर यांच्या जवळ आले आणि  त्यांनी राजजींना विचारले, काय झाले ? इतक्या रात्री ? सगळे ठीक आहे ना ? राज कपूर यांनी त्यांच्या एकाही प्रश्नाचे उत्तर न देता शैलेन्द्र यांना मिठीच मारली. हे काय होत आहे हेच शैलेन्द्र यांना क्षणभर कळेना. थोड्या वेळाने मिठी थोडी सैल झाली तेव्हा शैलेन्द्र यांना राज कपूर यांचे डोळे अश्रूंनी डबडबलेले दिसले. ते पाहून शैलेन्द्र यांनी त्यांना विचारले, काय झाले आहे ? काही दुर्घटना तर घडली नाही ना ? घरातले सगळे ठीक आहेत ना ? शैलेन्द्र यांनी एका दमातच प्रश्नांची सरबत्ती केली.या सगळ्या प्रश्नांवर राज कपूर यांच्या तोंडून इतकेच बाहेर पडले.....`भाई, काय अप्रतिम गीत लिहिले आहे तुम्ही ! ध्वनिमुद्रणाच्या स्टुडिओतून घरी आल्यापासूनच मी ते ऐकत बसलो आहे. गीत ऐकून माझे मन भरून आले आणि मला वाटले की याचक्षणी तुमच्याकडे जाऊन तुम्हाला कडकडून मिठी मारावी ! शैलेन्द्रजी, मी स्वतःवर ताबा ठेवू शकलो नाही आणि तुम्हाला दृढ आलिंगन देण्याची तीव्र इच्छा बरोबर घेऊनच अर्ध्या रात्री असा धावत पळत तुमच्याकडे आलो ......!'

अनिल तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे

## नवीन मोटार वाहन कायद्यात अनेक त्रुटी

आधुनिक केसरी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आज वाहतूकीच्या बळावर देशातील संपूर्ण उलाढाल होत असते. वाहतूक सुरळीत आहे म्हणून प्रत्येक वस्तू तळागाळापर्यंत पोहचतात. अशा परिस्थितीत जर संप झाला तर याचे परिणाम देशाच्या १४० कोटी जनतेला भोगावे लागतात.सरकारच्या मोटार वाहन कायद्याच्या विरोधात वाहतूकदारांना अचानक रस्त्यावर का उतरावे लागले? किंवा संपाचा मार्ग का अवलंबावा लागला? याचा विचार सरकारने गांभीर्याने केला का? सरकारने कायदा बनवितांना मोटार वाहतूक संघटनांशी अगोदर चर्चा केली का? देशातील संपूर्ण राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली का? यावरून स्पष्ट होते की सरकारने कोणत्याही संघटनांशी किंवा देशातील राज्यांच्या वाहतूक संबंधित विभागांशी किंवा संघटनांशी चर्चा न करता नवीन मोटार वाहन कायदा बनविल्याचे दिसून येते.दुर्घटनांवर आळा बसावा व गुन्हेगारांना योग्य शिक्षा व्हावी हे योग्य व मान्य आहे व याचे स्वागत सर्वच स्तरातून व्हायला पाहिजे आणि होईल सुध्दा.परंतु वाहन चालकांच्या हातुन चुकीने जर दुर्घटना घडली तर त्यांच्या तुटपुंज्या पगारातुन त्याने ७ लाख रुपये दंडाची रक्कम कोठुन भरावी.हिट अँड रन कायद्यात दोन वर्षांची सजा होती तीला एकदम १० वर्षे करने कितपत योग्य आहे. यामुळे दुर्घटनांवर आळा बसेल काय? याचाही विचार सरकारने करायला हवा.फक्त कायदा बनवुन चालणार नाही तर,सरकारने सुध्दा दुर्घटनांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे व त्या-त्या पध्दतीचे नियोजन असायला हवेत.संसदेत मंजूर झालेल्या भारतीय न्यायिक संहिता २०२३ या कायद्यानुसार हिट ॲण्ड रन प्रकरणात संबंधित दोषी चालकाला ७ लाख रुपयांपर्यंत दंड आणि १० वर्षांपर्यंतच्या तुरूंगवासाची तरतूद आहे.नवीन वाहन कायद्यातील १० वर्षाची शिक्षा ठिक आहे.परंतु ७ लाख रुपये दंड कोठुन भरणार.त्या वाहन चालकाचा पगार किती असतो याचा विचार सरकारने केला का? त्यांच्या परिवाराचा खर्च यांचा एकुण विचार केला का?आज वाहन चालकांचा तुटपुंजा पगार त्यात त्यांच्या परिवाराचा खर्च आणि अचानक त्याच्या हातुन चुकीने दुर्घटना झाली तर तो शिक्षा तर भोगुन घेईल.परंतु त्यांच्या जवळ ७ लाख रुपये येणार कोठुन याचा सरकारने कायदा बनवितांना थोडातरी विचार केला का? आणि दहा वर्षे शिक्षेच्या काळात त्याच्या परिवारावर काय परिणाम होईल याचाही विचार व्हायला हवा.अशा परिस्थितीत जर त्यांच्या घरच्यांना अट्याक आला किंवा मोठा आजार झाला  तर!असे अनेक प्रश्न उद्‌भवतात. यामुळेच देशासह महाराष्ट्राच्या विविध भागांमध्येही ट्रकचालक, वाहतूकदारांनी आक्रमक भूमिका घेऊन संप पुकारला होता. परंतु आता सरकारच्या लक्षात येत आहे की नवीन मोटार वाहन कायद्यात दुरुस्ती करण्याची गरज आहे.भारतीय दंडविधानाच्या कलम २७९(निष्काळजीने वाहन चालवणे),३०४-अ (निष्काळजीने मृत्यू होणे) आणि ३३८ (दुसऱ्याचा जीव धोक्यात घालणे) अंतर्गत हिट ॲण्ड रन प्रकरणातील दोषी ट्रक-बसचालकाला सध्या दोन वर्षांच्या कारावासाची तरतूद आहे. परंतु नवीन मोटार वाहन कायदा दुरुस्ती नंतर कलम १०४ (२) अंतर्गत एखादा चालक अपघातानंतर घटनास्थळावरून पळून गेला किंवा त्याने पोलिस किंवा दंडाधिकाऱ्यांना अपघाताची माहिती दिली नाही,तर त्याला सध्याच्या पाचपट म्हणजे १० वर्ष तुरूंगवास व जबर दंड म्हणजे ७ लाख रुपये हा सरकारचा घाईघाईने घेतलेला निर्णय असल्याचे मी समजतो.त्यामुळे या नवीन कायद्यातील त्रुटींचा तज्ञांच्या मदतीने विचार करून पुढील पावले सरकारने उचलावीत.आपण साधारणतः विचार केला तर वाहतूकदारांमध्ये ८० टक्के लोक गरीब टपक्यातील असतात आणि बाकी सर्वसाधारण किंवा श्रीमंत असतात एखाद्या श्रीमंत व्यक्तींच्या हाताने दुर्घटना झाली तर तो ७ लाखांपर्यंत दंड सहज भरू शकतो.

# चैतन्य देणारी झेंडूची फुले



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आधुनिक केसरी

**पावसाळा संपत आला की हिवाळा सुरू होतो. हेमंताची शितल सुरुवात म्हणजे मार्गशीर्ष होय. तसे पाहता बाह्य आकर्षणांनी नटलेला हा महिना मुळीच नाही; पण यातले थंडगार कण गात्रांना सुखविणारे,शांतविणारे असतात. पिवळ्या झेंडूचे रमणीय भ्रांतजाल, धुक्याची संवेदना, पहाटेची स्तब्धता किती मोहक आणि एकमेकांत गुंफलेल्या आहेत. इतर वेळेची धावपळ या महिन्यात मुळीच जाणवत नाही. मार्गशीर्ष महिना हा स्वतः पवित्र असल्यामुळे पूजेची आणि व्रताची पवित्रता याला लाभली असावी. गुलाबी थंडीतले सुगम नाद सतत पाठलाग करत असतात.**

स्वप्नांची रुणझुण चमत्कारिकता पापणीवर ओसरलेली दिसते. याचवेळी डोळ्यांना रंगांचे आकर्षण जडते. नव्या कार्याचा आरंभ आणि अलवार आनंद फुलणारी क्षण सहज हाताला गवसतात. अलवार मंद असा झेंडूचा सुवास येऊ लागला. तशी मी झुडूपाकडे पाहिले. मध्यम आकाराचे झेंडूचे झुडूप हे पिवळ्या धम्म फुलांनी लदबदून गेले होते. त्यात केशरी रंगाची गर्द लाल पाकळ्यात गुंडाळलेली फुले नुकतीच फुललेली असावी. हिवाळ्याची धुसर धुक्याची चादर झटकून नुकतेच दवाने स्नान केलेली ही फुले वाऱ्यासवे डुलत होती. 'फुले मोठी चंचल असतात.' यांची प्रचिती मला या झेंडूला पाहून आली ही फुले इतर फुलांसारखी मुळीच नसतात. म्हणजे मोगरा, चाफा, निशिगंध यांसारखा त्याचा सुवास लक्षात राहील असा नसतोच मुळी. मुळात त्याच्या सुवासापर्यंत जाऊन कोणी पोहोचतही नाही. ही फुले निरागस बाळासारखे असतात अल्लड आणि बाळशेदार. या फुलांचे झुडूपही मोठे लाघवी असते. तसे प्रत्येक झाड हे आपल्यात सुंदर असतेच यात शंका नाहीच. पावसाळ्यात नानाविध रंगाची आणि गंधाची फुले उमलतात त्यांचे काम हे माणसाचे मन आकर्षित करण्याचे असते. पावसाळ्यात माणूस प्रेमात पडतो त्याचे एक कारण ही फुलेच असणार; पण हिवाळा तसा मुळीच नाही या ऋतूत फुलांची गर्दी नसते आणि दरवळही नसतो तशी या गुलाबी थंडीत या झेंडूच्या रूपाचा कैफ कोणाला जडणार नाही? त्यात झेंडूचे फूल हे फार मनोहर असते. ते भल्या सकाळी पहाताच आपल्या आनंदाच्या मंजिऱ्या नाही दरवळल्या तर नवलच! मोठी टपोरी फुलं पावित्र्यांनी भरलेली असतात. त्यांच्या स्पर्शातच मांगल्य असते. प्रत्येक मोठ्या सण, उत्सवात ही फुले टामटूमीत सज्ज असतात. माणसाच्या मनाला जशी उदासीनता चिटकलेली असते. तशी मरगळ या फुलांमध्ये आपल्याला कधीच दिसणार नाही. सदाबहार रूप त्यांचे मन प्रफुल्लित करून टाकते. मला एक गोष्ट अगदी विश्वासाने माहिती आहे. तुम्ही झाडांवर प्रेम केलं, तर ती तुम्हांला तुमचं प्रेम डबल करून देतात. त्यामुळे प्रेम कुठे द्यायचं हे माणसाला कळालं तर मग नैराश्य कधी तुमच्या सावलीलाही शिवणार नाही पहा. घरात कोणतं मंगल कार्य असलं तर आपल्याला पहिली फुलचं आठवतात प्रत्येक फुलं हे आकर्षक असं शिल्पच असतं. शिवाय ते सतत हलत, रंगाने फुलतं, गंधांनी दरवळत असतं. प्रत्येकाचा रूप आणि ढब वेगळी असते. आता झेंडूच नाही का, पिवळ्या रंगात किती गोंडस आणि रंजक दिसतो. झेंडू विषयी मला आवडणारी अशी सर्वात छान गोष्ट म्हणजे झेंडूचे फूल हे पसारा करत नाही. एक शिस्तप्रियता त्यामध्ये असते. शिवाय ही फुले फार काळ टिकतात त्यामुळे देखील ही विशेष असतात. इतर फुलांच्या तुलनेत चटकन नजरेत भरतात ही माणसाला केवढा उत्साहात देतात. आता झेंडूच्या फुलांमध्ये एवढं कौतुक करण्यासारखं काय आहे? असं कोणी मला म्हणेल; पण मी सांगू इच्छिते, फुले तुम्हांला आनंद देतील त्याचं एक कारण, ही फुलं फक्त पवित्र स्थळीच वावरतात. त्यांच्या पावित्र्याचा एक गुण हा ही असेल. शिवाय ही फुलं मोठी हसरी आहेत त्यामुळे त्यांच्या लडिवाळपणाला तुम्ही कवटाळणारही हे शक्यच नाही. ही फुले रंगाने गर्द असल्याकारणाने दुरूनच आकर्षित करतात.



माणसाच्या मनात जीगीषा निर्माण करतात. ही फुलं उमलण्याचा काळही विलक्षण भारी, जेव्हा नभा चंद्राची शितल प्रभा व ताऱ्यांचा आर्द्र दयाशील मंद विलास आणि मोह घालणारी रात्र असते तेव्हा ही अल्लडफुले हळूच डोके वर काढतात. पुढे ही मोहक दिसू लागतात आणि आपल्या कामी पडतात. भक्तीतील द्वैत ओलांडून ही फुले पुढे येतात आणि मागे उडते ते फक्त त्यांचे आत्मसर्पण. मोठ्या खुशीने ते आपल्या ओंजळीत पडतात. त्यांना ठाऊकही नसते की ते देवकारणी पडतील, की दारावरले तोरण होणार, की कुणा संतांच्या पायघडी पडणार. भविष्याची तसूकभरही चिंता न करता किती विश्वासाने ते आपले सर्वस्व आपल्याला दान करतात. कोण देतं त्यांना हा विश्वास मोठी धाडसी आणि शूर असतात ही फुले. कवयित्रींचे विरह, दुःख पचवून तिला ह्रदयाशी लाव म्हणणारी ही फुले किती सुज्ञ असतात. फक्त जगणं म्हणजे मिठाविना अळणी पदार्थ जसा मिठाने पदार्थाला चव येते तशी प्रेमामुळे जगण्याला माधुर्यता येते. जगात प्रेमाचं अस्तित्व नसतं तर जगणं किती विरस झालं असतं. प्रेमाचं अस्तित्व हे आपल्याला फुलचं नाही का शिकवत. कुसुमांनी आणि किती सुंदर म्हटलं आहे, "उमललं आहे सुंदर फूल आणि एकच प्रेमाचं." माणसाला फुलांच्या प्रेमाचा कवच लाभलेला आहे. फुलं सुकली म्हणजे त्यांचं दुःख कधी मनाला पडत नाही. कारण त्या जागी, पुन्हा तेच फुल नव्याने फुलत असते फुलांमागून सुगंध उधळणारी फुलं माणसाला मिळतात. तशी विधात्याने व्यवस्था करूनच ठेवली आहे. संध्या समयी जसा अंधार दाटत असतो तसा या फुलांच्या गंधामुळे मनात व देहात प्रेमभक्ती उसळत असते. प्रेम गंधाने ओथांबलेला गंध आपल्याला बोलवीत असतो. फुलं आपल्याला खूप काही देऊन जातात. त्यांचा गंध आपल्याकडे ठेवून जातात. आपल्याला असं फुलांसारखं प्रेम करणं जमलं पाहिजे. मग जगणं किती सुंदर होईल या कल्पनेत मी हरकून गेले. हसरा झेंडूकडे पहात मी पुढील कामे हातात घेतली तोही वाऱ्या सवय झोके घेत आनंदाने डुलू लागला.



## सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** येथील डॉ. अब्दुल कलाम उर्दू महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पगुछ अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई यांच्या जीवन चारित्र्य बदद्ल वकृत्व सादरीकरण केले. आणि विद्यालयाच्या शिक्षकांनी सावित्रीबाई फुले यांच्या बद्दल माहिती विद्यार्थ्यांना दिली.यावेळेस विद्यालयाचे प्राचार्य शेख ए. एम, सबा फारुकी मॅडम, मेहराज शेख सर,खान मुशर्रफ सर आदी शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## भाजप युवा मोर्चा महामंत्रीपदी समीर लोखंडे

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय जनता युवा मोर्चा छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हा कार्यकारिणी जाहिर करण्यात आली असून भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा जिल्हा महामंत्रीपदी समीर लोखंडे यांची गुरुवारी (दि.२८) निवड करण्यात आली. शहर जिल्हा अध्यक्ष रामेश्वर भादवे यांनी ही निवड केली. त्यांच्या या निवडीबद्दल केंद्रीय अर्थ व वित्त नियोजन राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, गृहनिर्माण व इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर, शहराध्यक्ष शिरीष बोराळकर, माजी उपमहापौर प्रमोद राठोड यांनी अभिनंदन केले आहे. समीर लोखंडे यांचा चांगला जनसंपर्क असून विविध सामाजिक उपक्रमातून त्यांनी आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या अनुभवातून भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा चे संघटन अधिक मजबूत होईल असा विश्वास यावेळी भाजप पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी व्यक्त केला आहे. भारतीय जनता युवा मोर्चा ची नविन कार्यकारिणी देशाच्या उभारणीसाठी कटिबध्द आहे. पक्षाच्या बांधणीतील कार्यकर्त्यांचे योगदान सर्वोच्च आहे. पक्षासाठी कार्यकर्ते हेच सर्वस्व असून त्यांच्या अविरत कष्टामुळे पक्षाने आज नवी उंची गाठली असल्याचे भाजप च्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

## मोरेश्वर विद्यालयात बालिका दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**राजूर :** राजुर येथील मोरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बालिका दिन मोठ्या उत्साहात साजरा करून त्यांना अभिवादन करण्यात आले. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. स्त्रियांसाठी साक्षरतेची वाट प्रकाशमान करणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर मान्यवरांनी प्रकाशला. विद्यार्थिनींनी अनेक सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा केली होती.भाषणामधून विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे महत्त्व पटवून दिले.अनेक विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.ईश्वरी गवळी या विद्यार्थिनीस बालिका दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात अध्यक्ष होण्याचा मान मिळाला. या कार्यक्रमास मुख्याध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोरेश्वर विद्यालयाच्या वतीने सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करण्यात आले.





## ज्ञानकुंज महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय मध्ये  ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव व लोक विकास बँकेचे संचालक यांच्या हस्ते ज्या विद्यार्थ्यांनी सावित्रीच्या वेगवेगळ्या वेशभूषा सादर केल्या होत्या त्या विद्यार्थ्यांना  पेन वाटप करण्यात आले. व मा. भाऊसाहेब जी काळे साहेब यांनी माता सावित्रीबाई यांच्या जीवनावर व त्यांच्या कार्यावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी साक्षी नलावडे व ऋतुजा राऊत या विद्यार्थ्यांनी केलेयाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झिंजुर्के प्रा. मनोज राणे,श्रीमती योगिता पारनेरे  नितीन पवार, राम राठोड श्रीमती वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण,अविनाश गाडेकर,योगेश सुरडकर,श्रीमती सुरेखा जाधव, दीपक पाटील,राहुल गायकवाड,श्री भूषण जाधव,अविनाश कोलते,  अक्षय जाधव,श्रीमती नलावडे,पाचवने मॅडम, खान मॅडम ,चोपडे मॅडम, आजिनाथ जाधव , धुमाळ बाबा, यांची उपस्थिती होती.

## यवतमाळ जिल्ह्यात ५३ सायबर गुन्ह्यांची नोंद

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** आभासी जगात रमण्याचा फटका आता सर्वसामान्यांना बसू लागला आहे. सायबर गुन्हेगार अशा युजर्सची मानसिकता हेरून त्यांना जाळ्यात ओढून लुटत असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यात गेल्या वर्षात ५३ सायबर गुन्ह्याची नोंद झाली आहे. यात एक कोटींपेक्षा अधिक रक्कम अडकली आहे. सायबर क्राईम रोखण्यासाठी जिल्ह्यात स्वतंत्र सायबर पोलीस ठाणे स्थापण्यात आले. या पोलीस ठाण्यात दररोज सायबर गुन्ह्याची नोंद वाढत आहे. आतापर्यंत ५३ गुन्हे दाखल करण्यात आले. छत्तीसगड, राज्यस्थान, हरियाणा या प्रमुख राज्यात बसून सायबर गुन्हे केले जात असल्याचे तपासातून पुढे आले आहे. सायबर फ्रॉडर्स विविध प्रकारचे आमिष दाखवून आपले जाळे फेकतात.



# रायझिंग इंग्लिश स्कूलमध्ये सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील रायझिंग इंग्लिश स्कूल मध्ये दि.०३ सुर्यक्रांती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ज्ञान नाही विद्या नाही ते घेण्याची गोडी नाही बुद्धी असुनही चालत नाही त्यास मानव म्हणावे का ? दिनांक 03 जानेवारी म्हणजेच बालिका दिन व सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज मध्ये साजरा करण्यात आली या प्रसंगी अध्यक्षस्थानी श्रीमती. मनीषा गायकवाड मिस, तसेच प्रमुख पाहुन्याच्या स्थानी श्रीमती. निकिता खुटे मिस, श्रीमती शेळके मिस, श्रीमती आत्तार मिस श्रीमती नलावडे मिस, गायकवाड मिस, तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री.नलावडे सर,प्राचार्य. योगेश इंगळे सर, प्रा. भोपळे सर , प्रा. वेताळ सर, प्रा.गाडेकर सर उपस्थित होते तसेच बाल चिमुकल्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.भोपळे सर यांनी केले.

## धरण संकुलात विजेच्या धक्क्याने दोघांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** गोरेगाव पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या कटंगी धरण संकुलात विजेच्या धक्क्याने दोघांचा मृत्यू झाल्याची घटना आज, गुरुवारी सकाळी उघडकीस आली. गोरेगाव तालुक्यातील कटंगी येथील रहिवासी संपत वलथरे (४८) व घनश्याम वलथरे (३२) अशी मृतांची नावे आहेत. कटंगी येथे शेताजवळील कुंपणाला विद्युत प्रवाह जोडून जनावरांची शिकार करण्याची योजना या दोघांनी आखली होती. त्यांनी विद्युत प्रवाह घेण्याकरिता शेताजवळील उघड्या रोहित्राचा उपयोग करायचे ठरवले. मात्र, रोहित्रातून वीज घेताना त्यांना विजेचा धक्का बसला. यात त्यांचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज गोरेगाव ठाण्याचे पोलीस निरीक्षक भुसारी यांनी ‘लोकसत्ता’सोबत बोलताना वर्तविला आहे.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त 'फॅम'ने विद्यार्थ्यांना वाटले वही, पेन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** संभाजीनगर फेस ऑफ आंबेडकर राईट मुव्हमेंटने (फॅम) राहुलनगर बनेवाडी येथील महानगर पालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील 560 विद्यार्थ्यांना प्रत्येकी 5 वह्या व २ पेनचे वाटप केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी राबविलेल्या 'एक वही, एक पेन' अभियानातून जमा झालेले वही, पेन व इतर शैक्षणिक साहित्य हे गरजू व गरीब विद्यार्थ्यांना मोफत वाटप केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त (राहूल नगर)बनेवाडी येथील महानगर पालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत साहित्याचे वाटप करण्यात आले. पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना याचा लाभ देण्यात आला. शोषित घटकांपर्यंत शिक्षणाचे महत्त्व पोहोचावे तसेच शिक्षणापासून कोणी वंचित राहू नये, यासाठी 'फॅम'ने गेल्या ९ वर्षांपासून हे अभियान हाती घेतले आहे. या कार्यक्रमासाठी मनीष नरवडे, विशाल आढाव, दौलत सिरसवाल, गौतम बावस्कर, संदिप बोराडे, आदींनी परिश्रम घेतले. या उपक्रमासाठी शाळेतील शिक्षिका मेघा कदम, शिल्पा जंगले, सुनिता चौधरी, कल्पना गहिरे, श्रीम. योगिता बोरसे, रीना लिंगमपल्ले, श्रीमती संगीता खरात, मोहिनी बर्डे, प्रदीप अहिरे, सुनील नरवडे, संतोष माळे, शिददोधन वाघमारे, गोविंद कुलकर्णी, सतीश बागुल, राजेंद्र सोनवणे, प्रकाश उन्हाळे, भाग्येश्वर भुतेकर, शेख फसीउद्दीन,लहू गुढेकर इ शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.





## मोहन अग्रवाल यांच्या हस्ते विविध शिवसेना पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** येथील जिल्हा कार्यालयात जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांच्या हस्ते शिवसेनेच्या विविध पदाधिकाऱ्यांना आज नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले.

या मध्ये राजाराम आनंदराव भांडवलकर किसान सेना तालुका प्रमुख, गणेश लोमटे उपशहर प्रमुख ,कैलास पुरी उपशहर प्रमुख, महीला आघाडी परतुर शहर प्रमुख ,संगीताबाई मगर, सोनाली राऊत उपशहर प्रमुख यांना नियुक्ती पत्राचे शिवसेना जिल्हा प्रमुख मोहन अग्रवाल यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की, वंदनीय हिंदूहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशानुसार शिवसेना पक्षाच्या पदावर आपणास नियुक्त करण्यात येत आहे. सदर नियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा आहे तसेच पुढे आहे की, हिंदुरुदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांची शिकवण याचा आपण सक्रियपणे प्रचार आणि प्रसार कराल तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन सहकार्य करावे. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल ,तालुकाप्रमुख अमोल सुरंग, विधानसभा संघटक विजयकुमार गिरी ,शहर प्रमुख दीपक हिवाळे व आदी शिवसैनिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## महाराष्ट्रातील काही भागात पावसाची हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कोकण, मध्य महाराष्ट्रासह उत्तर महाराष्ट्रातील जळगाव, धुळे आणि नंदुरबारमध्ये शुक्रवार आणि शनिवारी हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नैऋत्य अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय आहे. उत्तर कोकणापासून उत्तर दिशेला हवेची द्रोणीय रेषा तयार झाली आहे. जम्मू ते उत्तर पाकिस्तानपर्यंत पश्चिमी विक्षेप (थंड हवेची स्थिती) तयार आहे, त्यामुळे दक्षिण हरयानासह लगत परिसरात हवेच्या वरील स्तरात हवेची चक्रीय स्थिती तयार झाली आहे. उत्तरेकडून येणारे थंड वारे आणि आग्नेय दिशेकडून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्याचा मध्य भारतात संयोग होऊन उत्तर महाराष्ट्रातील धुळे, जळगाव आणि नंदूरबारमध्ये हलक्या पावसाचा अंदाज आहे.

## वासाळी येथे भव्य डांगी संकरित जनावरांचे प्रदर्शन व शेतकरी मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यातील वासाळी येथे २४ जानेवारी ते २६ जानेवारी रोजी भव्य डांगी संकरित जनावरांचे प्रदर्शन व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती वासाळीचे सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष काशिनाथ कोरडे यांनी दिली आहे. वासाळी ग्रामपंचायत, घोटी कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या वतीने जय भवानी मातेच्या यात्रेनिमित्त डांगी जनावरांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. कोरोनो संसगामुळे गेल्या पाच वर्षांपासून तालुक्यात डांगी जनावरांचे प्रदर्शन बंद होते. मात्र या वर्षी प्रदर्शनाची जोरदार तयारी सुरु असुन २४ जानेवारीला या प्रदर्शनाचे उदघाटन होणार आहे. २५ जानेवारीला जनावरांची तपासणी करून यावर्षी डांगी बैलासह खिल्लारी, घोडा, बकरी, कोंबडी या प्रवर्गातील क्रमांक काढले जातील. डांगी व खिल्लारी जनावरा मध्ये अंदाज, २ दात, ४ दात, वळु आणि गाय या गटामध्ये प्रत्येकी ३ क्रंमाक काढले जाणार असुन भव्य बक्षीसांचे वितरण केले जाणार आहे. तर २६ जानेवारीला कुस्तीचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी गावकरी व सरपंच यांच्या मार्गदर्शनाखाली शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेचे पशुसंवर्धन अधिकारी डॉ. यांची भेट घेतली आहे. विशेष बाब म्हणजे या प्रदर्शनात घोडा बकरी व कोंबडीचे सुद्धा क्रमांक काढण्यात येणार आहे. तसेच या प्रदर्शनात नारायणगांव येथील कै. विठाबाई भाऊ मांग यांचा लोकनाट्य तमाशा प्रदर्शनाचे आकर्षण ठरणार आहे. या प्रदर्शनाचा महाराष्ट्रातील शेतकरी, व्यापारी, दुकानदार यांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन काशिनाथ कोरडे यांनी केले आहे.



# शहीद स्मारकासह अंतर्गत रस्ते कामांचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील पोलीस मुख्यालय येथे शहीद स्मारकासह अंतर्गत रस्त्यांची कामे,प्रवेशद्वार आदी कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आला. इतर प्रशासनिक सेवा वरील भांडवली खर्च व महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माणसाठी बांधकाम करणे या अंतर्गत सुमारे 4 कोटी 41 लाख कामाचे शुभारंभ आ.फारुख शाह यांच्या हस्ते आज करण्यात आले धुळे शहरातील संपूर्ण विकास व्हावा म्हणून आ.फारुख शाह यांचे प्रयत्न असून शहरातील प्रत्येक घटकाला न्याय मिळावा व विकास व्हावा म्हणून शासनाकडून करोडो रुपयांच्या निधी आणण्याचे काम आ.फारुख शाह यांनी केले आहे. त्यानंतर पोलीस बांधवांसाठी सुद्धा आ.फारुख शाह यांनी शासनाकडून चार कोटी 41 लाख रुपयाच्या निधी आणला आहे यात पोलीस मुख्यालय प्रवेशद्वार बांधणे तसेच पोलीस मुख्यालय कवांयत मैदान बैठक व्यवस्थेचे बांधकाम करणे, मैदानात ध्वजस्तंभ उभारणे व त्याचे बांधकाम करणे व पोलीस मुख्यालय परिसरात शहीद स्मारकाचे सुशोभीकरणासह लँडस्केप बगीचा आवार भिंतीस बांधकाम करणे तसेच पोलीस मुख्यालयातील मल्टीपर्पज हॉलचे नूतनीकरण करणे व पोलीस मुख्यालयातील व परिसरातील अंतर्गत रस्त्यांची सुधारणा करणे या बाबींसाठी हा निधी वापरला जाणार आहे यासाठी पोलीस बॉईज यांनी आ.फारुख शाह यांना निवेदन देवून मागणी केली होती. त्या अनुषंगाने आ.फारुख शाह यांनी तात्काळ याची दखल घेत शासनाकडे व गृहीभागाकडे या कामासाठी पाठपुरावा करून निधी आणलेला आहे तसेच आ.फारुख शाह यांनी धुळे जिल्ह्यातील पोलीस बांधवांसाठी स्वतःचे घर व्हावे म्हणून प्रस्ताव सादर केलेले असून ते सुद्धा लवकरच मंजूर होण्याची शक्यता आहे. या कामासाठी धुळे जिल्हा पोलीस कर्मचारी,पोलीस बॉईज तर्फे आ.फारुख शाह यांचे आभार मानण्यात आलेले आहे.देविदास चौधरी निवृत्त पोलीस निरीक्षक यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास आर.आर.पाटील कार्यकारी अभियंता,धर्मेंद्र झाल्टे उपअभियंता, नासिर पठाण, अध्यक्ष सेवानिवृत्त पोलीस असो, बॉबी वाघ, रऊफ पठाण, सलीम शेठ शाह, नगरसेवक नासिर पठाण, नगरसेवक सईद बेग, नगरसेवक अब्दुल गणी डॉलर, डॉ. दीपश्री नाईक, मौलवी शकील, निजाम सय्यद, कैसर अहमद, आसिफ शाह,प्यारेलाल पिंजारी, छोटू मच्छीवाले, हालीम शमसुद्दिन, इब्राहीम



शेख, नजर पथान, नुरा शेख, अकिब अली, समीर मिर्झा, शहजाद मन्सुरी फातिमा अन्सारी मलेखा खाटीक, सुलेमान मलिक, रफिक शाह, परवेज शाह, मुजाही शेख, फैसल अन्सारी आदी उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलिस बॉईज आणि पोलीस सेवानिवृत्त असो.यांनी प्रयत्न केले.



# अभिरुप शाळेत सावित्रीमाईंना अभिवंदन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त जवळा दे. येथे दिवसभर मुलींनी शाळा चालवली. सर्वप्रथम अभिरुप शाळेने सावित्रीमाईंना अभिवंदन केले. यावेळी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षक संतोष अंबुलगेकर, सहशिक्षक संतोष घटकार, शिक्षक मित्र कविता गोडबोले, मनिषा गच्चे, हैदर शेख, आनंद गोडबोले, हरिदास पांचाळ आदींची उपस्थिती होती. पहिल्या भारतीय महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या १९३ व्या जयंतीचे औचित्य साधून जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत अभिरुप शाळा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अभिरुप शाळेचे मुख्याध्यापक दीपाली गोडबोले यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच इतर अभिरुप शिक्षिकांनीही पुष्पवंदन केले. यात उपमुख्याध्यापक म्हणून अनुष्का झिंझाडे तर शिक्षिका म्हणून अक्षरा शिंदे, निशा गोडबोले, वैभवी शिखरे यांनी काम पाहिले. तसेच सेवक म्हणून पंचशील गच्चे यांने काम केले.
अभिरुप शाळेच्या मनोगत कार्यक्रमात कल्याणी शिखरे, कृष्णा शिखरे, रितेश गवारे, योगेश मठपती, राजवर्धन गवारे, शालीनी हटकर नामदेव पांचाळ, मोनिका गोडबोले, ज्ञानेश्वरी शिखरे, शिवानी शिखरे, तेजल शिखरे, अनन्या टिमके, सोनाली गोडबोले, सुप्रिया गच्चे, शाश्वती गच्चे, नागेश मठपती यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन मयुरी गोडबोले हिने केले तर आभार गीतांजली गोडबोले हिने मानले.

# लोणंदच्या आरोग्य शिबिरातून १२९ जणांच्या आरोग्याची तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** कालकथित शरद गोविंदराव खरात यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून समस्त खरात हितकारी संस्था,डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती,माता रमाई महिला मंडळ यांच्या वतीने लोणंद ता.खंडाळा येथील पंचशील बुद्ध विहारात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी एकूण १२९ जणांनी या आरोग्य शिबीराचा लाभ घेत आरोग्य तपासण्यात करून घेतल्या.
एक सामजिक बांधिलकी जपत हा उपक्रम पुण्यस्मरणाच्या अनुषंगाने घेतल्याबद्दल या शिबिर उपक्रमाचे कौतुक होत आहे. तसेच याच दिनाचे औचित्य साधत बुद्धविहारात एका शैक्षणिक उपक्रमास सुद्धा सुरूवात करण्यात आलेली आहे.तीन वर्षे पुढील सर्व मुला-मुलींसाठी मोफत इंग्रजी शिक्षणाचा वर्ग सुरु करण्यात आलेला आहे.
आआरोग्य शिबीर उद्‌घाटन कार्यक्रम विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न करण्यात आला. यावेळी लोणंद नगरीच्या नगराध्यक्षा सिमा वैभव खरात, उपनगराध्यक्ष रविंद्र क्षीरसागर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष दयानंद खरात, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील शेळके पाटील, खंडाळा पंचायत समितीचे माजी सभापती विनोद दादा क्षीरसागर, लोणंद नगरपंचायतीचे बांधकाम सभापती भरत शेळके, ॲड. बाळासाहेब बोडरे, अध्यक्ष जयकुमार खरात, नगरसेवक सागर शेळके, युवा नेते हर्षवर्धन शेळके,जेष्ठ सैनिक. मस्कुअण्णा शेळके, जावेद पटेल, जेष्ठ नेते भिकू कुरणे, नगरसेवक सचिन शेळके, भरत बोडरे, रमेश कर्णवर, भोपाल बागवडे, रविंद्र शहा, गोविंद पटेल, बाळासाहेब खरात, शेखर खरात, वैभव खरात, शशी खरात, राहुल खरात, सिध्देश खरात, शशांक खरात आदींसह समाज बांधव उपस्थित होते.
आरोग्य शिबिर आणि इंग्रजी वर्ग या दोन्ही उपक्रमाबद्दल विशेष कौतुक केले. सिव्हील हास्पिटल सातारा यांच्या मोलाच्या सहकार्यातून कान, नाक, घसा, मोतीबिंदू, रक्त दाब, मधुमेह आदी तपासण्या करून घेतल्या.यात १२९ रुग्णांनी सहभाग घेतला. हे आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी अतिष खरात, ॲड. अमित उ.खरात (सचिव समस्त खरात हितकारी, संस्था) यांनी विशेष परीश्रम घेतले.या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संतोष खरात यांनी केले.दररोज सायंकाळी ७ ते ८ या वेळेत मोफत इंग्रजी वर्गासाठी इंग्रजी विषयाच्या सुप्रसिद्ध शिक्षिका ज्ञानेश्वरी कांबळे यांची शिक्षक म्हणुन नेमणूक केली आहे. शिक्षिका ज्ञानेश्वरी कांबळे यांच्या माध्यमातून मुला मुलींना इंग्रजी शिकविण्यात येणार आहे. इंग्रजी भाषा ही जगाची खिडकी आहे. त्यामुळे मातृभाषेसोबतच इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे सुद्धा तितकेच गरजेचे आहे.बुद्धविहारात धम्म जागृतीचे कार्य घडत असते. इंग्रजी शिक्षणाचे महत्व लक्षात घेऊन पंचशील बुद्धविहारातून मुला मुलीं मध्ये इंग्लिश शिक्षणाची जागृती घडवून आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. नक्कीच यातून मुले मुली यांना इंग्रजी ज्ञान मिळत आहे. आपल्या लहानग्या मुला-मुलींना नित्याने बौद्ध विहार लोणंद या ठिकाणी पालकांनी पाठवून इंग्रजी विषयाचे मोफत शिक्षण द्यावे, असे आवाहन सुध्दा करण्यात आलेले आहे.



# ८ जानेवारीला घरावर पंचरंगी धम्मध्वज उभारावा : भदंत पंय्याबोधी थेरो

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** ८ जानेवारी हा ‘विश्‍व बौद्ध धम्मध्वज दिन’ म्हणून जगभरात साजरा केला जातो. बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसारासाठी संपूर्ण जगातील बौद्धांचे एकच प्रतिक असावे यासाठी सन १८८० मध्ये ‘विश्‍व बौद्ध धम्म ध्वजाची’ निर्मिती करण्यात आली. विश्‍व बौद्ध धम्मध्वज दिन समस्त भारतीय बौद्धांचा सण, उत्सव, सोहळा व्हावा यासाठी जागतिक धम्मध्वज दिनानिमित्त ८ जानेवारी रोजी बौद्ध उपासक किंवा उपासिकांनी आपल्या घरांवर पंचशील धम्मध्वज उभारुन विश्‍व धम्मध्वज दिन साजरा करावा असे आवाहन तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक तथा अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष, संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी केले आहे. यावेळी भिख्खू संघ, उपप्राचार्य साहेबराव इंगोले, प्रा. एस. एच. हिंगोले, प्रा. विनायक लोणे, प्रज्ञाधर ढवळे, एस. एन. गोडबोले, नागोराव नरवाडे, आप्पाराव नरवाडे आदींची उपस्थिती होती. विश्‍व बौद्ध धम्मध्वज दिनानिमित्त श्रामणेर प्रशिक्षण केंद्र खुरगाव नांदुसा येथून ८ जाने २०२३ रोजी तब्बल १४४ फुटांचा धम्मध्वज हाती धरून महाधम्मध्वज महापदयात्रा निघणार आहे. ही पदयात्रा खुरगाव पाटी, पासदगाव, नेरली फाटा, भावसार चौक ते आयटीआय कॉर्नर आणि भ. गौतम बुद्ध यांच्या नियोजित जागेपासून फुले पुतळा ते शिवाजी नगर , कलामंदिर मार्गे शहरातील रेल्वेस्टेशन नजिकच्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहाराने अभिवादन करुन महापदयात्रेचा समारोप होणार आहे. ८ जानेवारी रोजी सर्व बौद्ध बांधवांनी आपल्या घरावर पंचरंगी धम्मध्वज उभारुन महापदयात्रेत मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भदंत पंय्याबोधी थेरो, भिक्खू संघ आणि आंबेडकरी समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# पत्रकार दिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन; आरोग्य शिबिर व ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** आद्य पत्रकार तथा दर्पणचे संपादक बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृती जागवण्यासाठी ६ जानेवारी रोजी सर्वत्र पत्रकारदिन साजरा करण्यात येतो. त्याअनुषंगाने व्हॉईस ऑफ मीडिया रिसोडच्या वतीने ५जानेवारी रोजी पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर, जेष्ठ पत्रकारांचा सत्कार आदी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रिसोड येथील पत्रकार कार्यालयात सदर कार्यक्रम पार पडणार असल्याची माहिती व्हॉईस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष विनोद पाटील बोडखे यांनी दिली आहे.

पत्रकार दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान तहसिलदार प्रतिक्षा तेजनकर भूषविणार आहेत.तर बाजार समितीचे सभापती संजय शिंदे, गट विकास अधिकारी प्रमोद बदरखे, ठाणेदार देवेंद्र सिंह ठाकुर, रजिस्ट्रार अधिकारी श्री सोनवणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता श्री चिंचोले, पोलीस उपनिरक्षक अशोकराव गिते आदिंची उपस्थिती राहणार आहे. व्हॉईस ऑफ मीडिया ही पत्रकारिता व पत्रकार यांच्या हितासाठी झटणारी देशातील सर्वात मोठी पत्रकारांची संघटना आहे. सदर संघटनेच्या नियोजनानुसार व्हॉईस ऑफ मीडिया रीसोड तालुक्याच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये पत्रकार व त्यांच्या परिवारातील सर्व सदस्यांची आरोग्य तपासणी, पत्रकारितेत मोठे योगदान देणारे जेष्ठ पत्रकार तसेच सामाजिक क्षेत्रात एक वेगळा आदर्श निर्माण केलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात येणार आहे. तद्वतच ज्या पत्रकारांच्या मुलांनी विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवले आहे, अशा पाच मुलांचा व त्यांच्या आई, वडिलांचा सन्मान आणि गौरव करण्यात येणार आहे.शिवाय तालुका व गाव पातळीवरील उत्कृष्ट काम करणाऱ्या पदाधिकारी यांचा सुद्धा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती व्हॉईस ऑफ मीडियाचे रिसोड तालुकाध्यक्ष बोडखे यांनी दिली आहे.

VOICE OF MEDIA

# ठेवा मोबाईल, हाती घ्या पुस्तक!

## प्रा.डॉ. विठ्ठल जायभाये यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** येथील सावित्रीबाई फुले विचार मंच आणि सावित्रीबाई फुले महिला बचत गट जिंतूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 3 जानेवारी 2024 रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती कटारे मळा पोस्ट ऑफिस रोड जिंतूर येथे साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये बोलत होते. या कार्यक्रमाचे आयोजन सावित्रीबाई फुले बचत गटाच्या अध्यक्षा सौ.सुनीताताई पाचलेगावकर सचिव, उपाध्यक्ष आदी महिलांनी केले होते. याप्रसंगी डॉ.जायभाये यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले-महात्मा ज्योतिराव फुले यांच्या महान कार्यावर प्रकाश टाकला. ज्या महामानवांनी रक्ताचे पाणी करून देशाचा कानाकोपरा उजळून टाकण्याचे महत्कार्य केले त्यांच्या कार्याची परतफेड आपण प्रत्येकाने होईल ते सत्कर्म करून करायला हवी. तरुण-तरुणींना आज मोबाईल ने विळखा घातला आहे. शिकले सवरलेले लोक आज समाज उपयोगी कामे करत नाहीत. वाचन-लेखन बंद झाले आहे. दारू-गुटखा-तंबाखू इत्यादी व्यसनांनी सगळीकडे थैमान घातले आहे. देश अधोगतीला जातोय. हे थांबवायचे असेल तर आपण सर्वांनी मोबाईल बाजूला ठेवून महापुरुषांची चरित्रे, विविध ग्रंथ वाचण्या-लिहिण्याची वेळ आली आहे, असे प्रतिपादन केले. याप्रसंगी डॉ.अनुराधा लांडगे या तरुणीची मेडिकल ऑफिसर म्हणून निवड झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ.तायडे मॅम होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.अशोक वैद्य यांनी केले. कार्यक्रमाला वसमतचे प्रा. सचिन राऊत, मा.नगरसेवक श्री गंगाधर गोरे, श्री योगीराज फड, सौ.अंजली फड, इंगोले सर, डॉ.लांडगे साहेब, दत्ता कटारे, अरविंद कटारे, गुलाब नाहादकर, राजेश लांडगे, गजानन बुरकुले आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते. या प्रसंगी लिंबाळा तांडा येथील कु.निकिता गुंजाळ नावाच्या चिमुकलेने "मी सावित्रीबाई फुले बोलतेय!" ही एकांकिका सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री डुब्बे सर यांनी केले तर आभार श्री संजय जवळे सर यांनी मानले. याप्रसंगी स्त्री, पुरुष, आबाल-वृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.



# मुलांना शालेय साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त जि.प.प्रा शाळा नवीन कौठा येथे सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. त्यानंतर शाळेतील चिमुकल्या विद्यार्थिनीने सुद्धा सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा परिधान करून सावित्रीबाईंना अभिवादन केले. जयंती सोहळ्यानिमित्त युवा नेते संजय कवठेकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रदीप ससाने यांच्याकडून सर्व मुलींना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. या वेळी मुख्याध्यापक रामदास कदम, सहशिक्षक बालाजी बड्डू, शाहु कोरडे, बालाजी ठाकुर, कमल पैनापल्ले, प्रभावती राणेनंदा कांबळे आदी उपस्थित होते. सतरंगी साहित्य मंडळ व नवयुवक भीम जयंती मंडळ नवीन कौठा चे अध्यक्ष राहुल हैबते, जळबा सोनकांबळे, सुरज चित्ते, शेख महेफुज आदींनी परिश्रम घेतले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आपले विचार मांडले. तसेच बालाजी ठाकूर सर यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संयोजन हे सप्तरंगी साहित्य मंडळ व नवयुवक भीम जयंती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

# सिद्धार्थ चौकातील सुशोभीकरण कामाचे करण्यात आले उद्घाटन



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील देवपूर भागात असलेल्या सिद्धार्थ चौक परिसरातील सुशोभीकरण कामाचा आज माजी उपमहापौर नागसेन बोरसे यांच्या स्थानिक विकास निधी मधून कुदळ मारून भूमिपूजन करण्यात आले यावेळी विविध मान्यवरांसोबत परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. धुळे शहरातील सिद्धार्थ मित्र मंडळाच्या वतीने माजी उपमहापौर असलेल्या नागसेन बोरसे यांच्याकडे सिद्धार्थ चौक परिसरातील सुशोभीकरण करण्याच्या संदर्भात मागणी करण्यात आली होती. त्यांनी सिद्धार्थ कॉलनीतील नागरिकांची ही मागणी लक्षात घेऊन तातडीने धुळे महानगरपालिका येथील त्यांच्या स्थानिक नगरसेवक विकास निधीमधून पाच लाख रुपये मंजूर करून घेत या सुशोभीकरण कामाच्या मंजुरी मिळवून घेतली होती. सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने औचित्य साधत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करत आज सिद्धार्थ चौकातील सुशोभीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी माजी उपमहापौर नागसेन बोरसे, माजी महापौर प्रतिभा चौधरी, ॲड. विशाल साळवे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचे प्राचार्य बहिरम सर, विधी महाविद्यालयाचे शशिकांत पाटील, भास्कर शिंदे, पंकज नेतकर, इंजिनियर अविनाश थोरात, विवेक नेतकर, सिद्धार्थ वाघ, रावसाहेब विक्रांत साळवे, विशाल मोरे, प्रीतम रामोशी, विशाल परोळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर